मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्यकार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

ता.जि.ठाणे 401101

क्रीडा विभाग

मा. प्रशासकीय सभा दि.02/03/2023

// गोषवारा //

प्रकरण क्रं. २७७ :- कुस्ती प्रशिक्षणासाठी वस्ताद (कोच) या पदास मुदतवाढ मिळणेबाबत

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कुस्तीपटुंना शास्त्रशुध्द प्रशिक्षण देण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (3) नुसार सहा महिन्यांकरीता मा. आयुक्त सो. यांच्या अधिकारामध्ये श्रीम. कोमल सुनिल देसाई यांची नेमणूक करण्यात आलेली होती. सदर नेमणूक ही सहा महिन्यांकरीता करण्यात आलेली असुन दि.22/02/2023 रोजी नेमणूक कालावधी संपुष्टात येणार आहे.

तरी कुस्ती महिला प्रशिक्षक (वस्ताद) श्रीम. कोमल सुनिल देसाई यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील सहा महिन्यांकरीता मुदतवाढ करणेबाबत तसेच सदर वस्ताद यांचे मानधन "क्रीडा प्रशिक्षक नेमणे/प्रोत्साहान-प्रशिक्षण देणे/आर्थिक मदत करणे/क्रीडा शिक्षकांचे मानधन" या लेखाशिर्षातुन अदा करण्याबाबतचा विषय मा.प्रशासकीय ठराव करणेस मंजुरीस्तव् सादर.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (क्रीडा विभाग)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्यकार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

ता.जि.ठाणे 401101

क्रीडा विभाग

मा. प्रशासकीय सभा दि. 02/03/2023

// प्रशासकीय ठराव //

प्रकरण क्रं.२७५ कुस्ती प्रशिक्षणासाठी वस्ताद (कोच) या पदास मुदतवाढ मिळणेबाबत

प्रशासकीय ठराव २७६ दिनांक :- 02/03/2023

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कुस्तीपटुंना शास्त्रशुध्द् प्रशिक्षण देण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (3) नुसार सहा महिन्यांकरीता मा. आयुक्त सो. यांच्या अधिकारामध्ये श्रीम. कोमल सुनिल देसाई यांची नेमणूक करण्यात आलेली होती. सदर नेमणूक ही दि.22/08/2022 ते दि.22/03/2023 पर्यंत सहा महिन्यांकरीता करण्यात आलेली असुन दि.22/03/2023 रोजी नेमणूक कालावधी संपुष्टात येणार आहे.

तरी कुस्ती महिला प्रशिक्षक (वस्ताद) श्रीम. कोमल सुनिल देसाई यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.24/03/2023 ते दि.22/09/2023 पर्यंत पुढील सहा महिन्यांकरीता मुदतवाढ करणेबाबत तसेच सदर कुस्ती वस्ताद यांचे मानधन क्रीडा प्रशिक्षक नेमणे/प्रोत्साहान-प्रशिक्षण देणे/आर्थिक मदत करणे/क्रीडा शिक्षकांचे मानधन या लेखाशिर्षातुन अदा करणेबाबत मा. प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे. पारित ठरावानुसार क्रीडा विभागाने पुढील कार्यवाही प्रस्तावित करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग

मा. प्रशासकीय सभा दि. 02 /03/2023

// गोषवारा //

प्रकरण :-२७८ पावसाळयापुर्वी नालेसफाई / खोदाई कामाच्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळयापुर्वी कच्चे /पक्के नालेसफाई खोदाई करणे, निघालेला गाळ/माती/कचरा वाहतुक करणे, इत्यादी कामासाठी आवश्यक लागणारे कंत्राटी मजुर, यंत्रसामुग्री, वाहने भाडयाने घेणे कामी मंजुर निविदाकार मे. एम. ई. प्राजेक्ट प्रा. लि. यांच्या समवेत करारनामा करुन दि.18/04/2022 कामाचा कार्यादेश देण्यात आला होता.

शहरातील बहुसंख्य कच्चे/ पक्के नाले हे नागरी लोकवस्तीच्या लगत वाहत आहेत. त्याचप्रमाणे शहरातील अरुंद रस्ते/ गल्ल्या, दाट लोकवस्ती इत्यादी मधुन जे.सी.बी./पोकलन/बोटपोकलन/हायड्रा आदी यंत्रसामुग्री व डंपर/ टोरस वाहने वाहतुक करणे शक्य नसल्याने, त्या ठिकाणचे नाले सफाईची कामे तसेच गाळ/ माती /कचरा वाहतुकीची कामे कंत्राटी मजुरांमार्फत करुन वाहनात भरावा लागत आहे. परिणामी यंत्रसामुग्रीच्या तुलनेत मजुरांमार्फत नालेसफाईची कामे मोठयाप्रमाणात करण्यात आलेली आहेत.

मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी एक महिना अगोदर नाले सफाई कामास सुरूवात करण्यात आलेली आहे. नाले सफाईच्या कामावर मा. महापौर, मा. नगरसेवक, यांचेमार्फत वेळोवेळी पाहाणी दौरा करण्यात आलेला आहे. सदर दौ-या अंतर्गत मा. महापौर व मा. नगरसेवक/नगरसेविका यांचेमार्फत नाले सफाई कामाबाबत करण्यात आलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करून त्यानुसार नालेसफाईची कामे करण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे मागील वर्षाच्या तुलनेत पेट्रोल व डिझेलचे दरातील वाढ, त्याचप्रमाणे कंत्राटी मजुर, जेसीबी, पोकलन, बोटसहपोकलन, हायड्रा मशीन, डंपर, टोरस, आदी बाबींच्या दरात वाढ झालेली आहे. त्यानुसार निविदेमध्ये दर प्राप्त झालेले आहेत. त्यास मा. स्थायी समिती सभा दि.12/04/2022, ठराव क्र. 02 अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

मागील वर्षी मंजुर दराशी तुलना करता या वर्षी वापर करण्यात आलेले मनुष्यबळ व यंत्रासामुग्री यांच्यादरातील फरक खालीलप्रमाणे आहे.

क्र.	पुरवठा प्रकार	सन 2022 चे मंजुर दर	सन 2021 चे मंजुर दर	दरातील फरक
01	कंत्राटी कामागार	रू. 1250/- प्रती शिफ्ट	रु. 999/- प्रती शिफ्ट	रु. 251/-
02	जे.सी.बी. मशीन	रू. 1075/- प्रती तास	रु. 925/- प्रती तास	रु. 150/-
03	पोकलन मशीन	रू. 2100/- प्रती तास	रु. 1800/- प्रती तास	रु. 300/-
04	बोटसह पोकलन	रू. 2400/- प्रती तास	रु. 2100/- प्रती तास	रु. 300/-
05	हायड्रा मशीन	रू. 990/- प्रती तास	रु. 875/- प्रती तास	रु. 115/-
06	डंपर	रू. 7200/- प्रती शिफ्ट	रु. 5000/- प्रती शिफ्ट	रु. 2200/-
07	टोरस	रू. 9990/- प्रती शिफ्ट	रु. 7400/- प्रती शिफ्ट	रु. 2590/-

वरीलप्रमाणे नाले सफाई कामासाठी मंजुर झालेल्या दराचा तुलनात्मक तक्ता पाहता, मागील वर्षीच्या तुलनेत वाढीव दर आलेले आहेत. त्यामुळे आजतगायत स्वच्छता निरिक्षक यांचेमार्फत नाले सफाई कामी वापरण्यात आलेल्या कंत्राटी कामगार, जे.सी.बी./पोकलन/बोटपोकलन/हायड्रा आदी यंत्रसामुग्री व डंपर/टोरस आदी बाबींवर दि. 24/05/2022 पर्यंत झालेला खर्च व बहुतांश नाले शिल्लक असल्याने ते पावसाळयापुर्वी पुर्ण करणे कामी मजुर व यंत्रसामुग्री पुरवठा अहवाल सादर केले आहेत. यामुळे नाले सफाई कामी झालेल्या खर्चाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

प्र. स. क्र.	प्रकार	एकुण झलेल्या कामाचा एकुण खर्च (रू.)	ठेकेदारास प्रदान करण्यात आलेला खर्च (रू.)	प्रदान करावयाचा एकुण खर्च (रू.)
01, 02 03, 04 05, 06	कंत्राटी मजुर	3,46,06,250/-	2,68,32,500/-	77,73,750/-
	जे.सी.बी. मशीन	19,09,200/-	-	19,09,200/-
	पोकलन मशीन	18,79,500/-	-	18,79,500/-
	बोटसह पोकलन	11,11,200/-	-	11,11,200/-
	हायड्रा	2,01,960/-	-	9,90,990/-
	टोरस	45,35,460/-	-	45,35,460/-
	डंपर	30,74,400/-	-	30,74,400/-
एकुण		**4,73,17,970/-**	**2,68,32,500/-**	**2,04,85,470/-**

सन 2022-23 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पात आरोग्य व सोयी अंतर्गत पावसाळयापुर्वी नाले सफाई या लेखाशिर्षाखाली रू. 300.00 लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

शहराची भौगोलिक रचना, हवामान विभागाचा पावसा बाबतीतील अंदाज तसेच पावसाळया दरम्यान नागरीकांना होणारी गैरसोय आदी बाबींचा विचार केला असता, शहरातील नालेसफाईची कामे मुदतीत पुर्ण करणे अनिवार्य होते. त्यामुळे शहरातील प्रत्यक्ष झालेली नालेसफाईची कामे व होणारी नालेसफाईची कामे याबाबत वरील तक्त्याचे अवलोकन केले शहरातील नालेसफाई अंतर्गत झालेल्या वाढीव कामास कार्योत्तर मंजुरीच्या अधिन राहुन नालेसफाईची कामे पुर्ण करून घेण्यात आली आहेत. नाले सफाई कामी वाढीव रु. 1,73,17,970/- खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेस शिफारस असे.

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

(रवि पवार)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग

प्रशासकीय ठराव दि.02/03/2023

प्रकरण :- २७८ **पावसाळयापुर्वी नालेसफाई / खोदाई कामाच्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.**

ठराव क्र. :- २७७

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळयापुर्वी कच्चे /पक्के नालेसफाई खोदाई करणे, निघालेला गाळ/माती/कचरा वाहतुक करणे, इत्यादी कामासाठी आवश्यक लागणारे कंत्राटी मजुर, यंत्रसामुग्री, वाहने भाडयाने घेणे कामी मंजुर निविदाकार मे. एम. ई. प्राजेक्ट प्रा. लि. यांच्या समवेत करारनामा करुन दि.18/04/2022 कामाचा कार्यादेश देण्यात आला होता.

शहरातील बहुसंख्य कच्चे/ पक्के नाले हे नागरी लोकवस्तीच्या लगत वाहत आहेत. त्याचप्रमाणे शहरातील अरुंद रस्ते/ गल्ल्या, दाट लोकवस्ती इत्यादी मधुन जे.सी.बी./पोकलन/बोटपोकलन/हायड्रा आदी यंत्रसामुग्री व डंपर/ टोरस वाहने वाहतुक करणे शक्य नसल्याने, त्या ठिकाणचे नाले सफाईची कामे तसेच गाळ/ माती /कचरा वाहतुकीची कामे कंत्राटी मजुरांमार्फत करुन वाहनात भरावा लागत आहे. परिणामी यंत्रसामुग्रीच्या तुलनेत मजुरांमार्फत नालेसफाईची कामे मोठयाप्रमाणात करण्यात आलेली आहेत.

मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी एक महिना अगोदर नाले सफाई कामास सुरूवात करण्यात आलेली आहे. नाले सफाईच्या कामावर मा. महापौर, मा. नगरसेवक, यांचेमार्फत वेळोवेळी पाहाणी दौरा करण्यात आलेला आहे. सदर दौ-या अंतर्गत मा. महापौर व मा. नगरसेवक/नगरसेविका यांचेमार्फत नाले सफाई कामाबाबत करण्यात आलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करून त्यानुसार नालेसफाईची कामे करण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे मागील वर्षाच्या तुलनेत पेट्रोल व डिझेलचे दरातील वाढ, त्याचप्रमाणे कंत्राटी मजुर, जेसीबी, पोकलन, बोटसहपोकलन, हायड्रा मशीन, डंपर, टोरस, आदी बाबींच्या दरात वाढ झालेली आहे. त्यानुसार निविदेमध्ये दर प्राप्त झालेले आहेत. त्यास मा. स्थायी समिती सभा दि.12/04/2022, ठराव क्र. 02 अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

मागील वर्षी मंजुर दराशी तुलना करता या वर्षी वापर करण्यात आलेले मनुष्यबळ व यंत्रासामुग्री यांच्यादरातील फरक खालीलप्रमाणे आहे.

क्र.	पुरवठा प्रकार	सन 2022 चे मंजुर दर	सन 2021 चे मंजुर दर	दरातील फरक
01	कंत्राटी कामागार	रू. 1250/- प्रती शिफ्ट	रु. 999/- प्रती शिफ्ट	रु. 251/-
02	जे.सी.बी. मशीन	रू. 1075/- प्रती तास	रु. 925/- प्रती तास	रु. 150/-
03	पोकलन मशीन	रू. 2100/- प्रती तास	रु. 1800/- प्रती तास	रु. 300/-
04	बोटसह पोकलन	रू. 2400/- प्रती तास	रु. 2100/- प्रती तास	रु. 300/-
05	हायड्रा मशीन	रू. 990/- प्रती तास	रु. 875/- प्रती तास	रु. 115/-
06	डंपर	रू. 7200/- प्रती शिफ्ट	रु. 5000/- प्रती शिफ्ट	रु. 2200/-
07	टोरस	रू. 9990/- प्रती शिफ्ट	रु. 7400/- प्रती शिफ्ट	रु. 2590/-

वरीलप्रमाणे नाले सफाई कामासाठी मंजुर झालेल्या दराचा तुलनात्मक तक्ता पाहता, मागील वर्षीच्या तुलनेत वाढीव दर आलेले आहेत. त्यामुळे आजतगायत स्वच्छता निरिक्षक यांचेमार्फत नाले सफाई कामी वापरण्यात आलेल्या कंत्राटी कामगार, जे.सी.बी./पोकलन/बोटपोकलन/हायड्रा आदी यंत्रसामुग्री व डंपर/टोरस आदी बाबींवर दि. 24/05/2022 पर्यंत झालेला खर्च व बहुतांश नाले शिल्लक असल्याने ते पावसाळयापुर्वी पुर्ण करणे कामी मजुर व यंत्रसामुग्री पुरवठा अहवाल सादर केले आहेत. यामुळे नाले सफाई कामी झालेल्या खर्चाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

प्र. स. क्र.	प्रकार	एकुण झलेल्या कामाचा एकुण खर्च (रू.)	ठेकेदारास प्रदान करण्यात आलेला खर्च (रू.)	प्रदान करावयाचा एकुण खर्च (रू.)
01, 02 03, 04 05, 06	कंत्राटी मजुर	3,46,06,250/-	2,68,32,500/-	77,73,750/-
	जे.सी.बी. मशीन	19,09,200/-	-	19,09,200/-
	पोकलन मशीन	18,79,500/-	-	18,79,500/-
	बोटसह पोकलन	11,11,200/-	-	11,11,200/-
	हायड्रा	2,01,960/-	-	9,90,990/-
	टोरस	45,35,460/-	-	45,35,460/-
	डंपर	30,74,400/-	-	30,74,400/-
एकुण		**4,73,17,970/-**	**2,68,32,500/-**	**2,04,85,470/-**

सन 2022-23 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पात आरोग्य व सोयी अंतर्गत पावसाळयापुर्वी नाले सफाई या लेखाशिर्षाखाली रू. 300.00 लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

शहराची भौगोलिक रचना, हवामान विभागाचा पावसा बाबतीतील अंदाज तसेच पावसाळया दरम्यान नागरीकांना होणारी गैरसोय आदी बाबींचा विचार केला असता, शहरातील नालेसफाईची कामे मुदतीत पुर्ण करणे अनिवार्य होते. त्यामुळे शहरातील प्रत्यक्ष झालेली नालेसफाईची कामे व होणारी नालेसफाईची कामे याबाबत वरील तक्त्याचे अवलोकन केले शहरातील नालेसफाई अंतर्गत झालेल्या वाढीव कामास कार्योत्तर मंजुरीच्या अधिन राहुन नालेसफाईची कामे पुर्ण करून घेण्यात आली आहेत. नाले सफाई कामी वाढीव रु. 1,73,17,970/- खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मालमत्ता व्यवस्थापन विभाग

// गोषवारा //

दि. 02/03/2023

प्रकरण क्रमांक (२७९) :- नामकरण करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, चौक व बगीचा यांचे नामकरण करण्यासाठी खालील प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

अ.क्र.	ठिकाण	प्रस्तावित नाव
1	भाईंदर (प.) माहेश्वरी भवन रोड येथील आरक्षण क्र.135 येथील बगीचा	"स्वर्गीय मनहरलाल मेहता" (मनुभाई) उदयान
2	भाईंदर (प.) प्रभाग क्र.08 मधील मॅक्सस लगत सरोज प्लाझा ते विशाल आपार्टमेंट पर्यंतचा रस्ता	"स्वर्गीय मनहरलाल मेहता" मार्ग

वरील प्रमाणे रस्ते, चौक, वास्तु यांना नावे देण्याबाबत मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात वरील प्रमाणे नावे देण्यास शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.

PC-1/2022-23/SM/SG-21

मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक ०२ मार्च 2023 रोजी दु. १२.०० वाजता.

विषय क्र. (२७९) मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज
नामकरण करणेबाबत.

कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, चौक व बगीचा यांचे नामकरण करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे दस्तऐवज तपासले असता यापुर्वी खालील नमुद रस्ते, चौक व बगीचा यास नावे देण्याबाबत खालील प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

अ.क्र.	ठिकाण	प्रस्तावित नाव
1	भाईंदर (प.) माहेश्वरी भवन रोड येथील आरक्षण क्र.135 येथील बगीचा	"स्वर्गीय मनहरलाल मेहता" (मनुभाई) उदयान
2	भाईंदर (प.) प्रभाग क्र.08 मधील मॅक्सस लगत सरोज प्लाझा ते विशाल आपार्टमेंट पर्यंतचा रस्ता	"स्वर्गीय मनहरलाल मेहता" मार्ग

वरील प्रमाणे रस्ते, चौक व बगीचा यांना नावे देण्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात वरील चौक व रस्ता यांना नावे देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. २७८ दिनांक ०२/ ०३ /2023

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, चौक व बगीचा यांचे नामकरण करण्यासाठी कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा

भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानुसार मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, चौक व बगीचा यांचे नामकरण करण्यांसाठी मान्यता देण्यात येत आहे.

वरील निर्णयाची नियमानुसार संबंधित विभागाने अंमलबजावणी करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-1/22-23/SM/SG T- 12

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मालमत्ता व्यवस्थापन विभाग

// गोषवारा //

दि. 02/03/2023

प्रकरण क्रमांक (260) :- भाईंदर (पुर्व प्रभाग समिती क्र. 03 मधील आ. क्र. 108 वर बनविण्यात येणाऱ्या सभागृहाचे नाव "वैश्यगुरु प. पुज्य. वामनाश्रम महास्वामी सभागृह" असे नाव देण्याबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, चौक व वास्तु यांचे नामकरण करण्यासाठी खालील प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

अ.क्र.	ठिकाण	प्रस्तावित नाव
1	भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदानावरील मार्केटच्या वरील महानगरपालिका सभागृह	"वैश्यगुरु प. पुज्य. वामनाश्रम महास्वामी सभागृह"

वरील प्रमाणे रस्ते, चौक, वास्तु यांना नावे देण्याबाबत मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात वरील प्रमाणे नावे देण्यास शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.

PC-1/2022-23/SM/SG-22

मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक ०२ मार्च 2023 रोजी दु. १२.०० वाजता.

विषय क्र. (२८०) :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

भाईंदर (पुर्व) प्रभाग समिती क्र. 03 मधील आ. क्र. 108 वर बनविण्यात येणाऱ्या सभागृहाचे नाव "वैश्यगुरु प. पुज्य. वामनाश्रम महास्वामी सभागृह" असे नाव देण्याबाबत.

कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पुर्व) प्रभाग समिती क्र. 03 आ. क्र. 108 येथील भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदानावरील मार्केटच्या वरील महानगरपालिका सभागृहाला "वैश्यगुरु प. पुज्य. वामनाश्रम महास्वामी सभागृह" असे नाव देण्याबाबत खालील प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

अ.क्र.	ठिकाण	प्रस्तावित नाव
1	भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदानावरील मार्केटच्या वरील महानगरपालिका सभागृह	"वैश्यगुरु प. पुज्य. वामनाश्रम महास्वामी सभागृह"

वरील प्रमाणे रस्ते, चौक, वास्तु यांना नावे देण्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात वरील चौक व रस्ता यांना नावे देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. २८० दिनांक ०२/०३/2023

भाईंदर (पुर्व) प्रभाग समिती क्र. 03 आ. क्र. 108 येथील भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदानावरील मार्केटच्या वरील महानगरपालिका सभागृहाला "वैश्यगुरु प. पुज्य. वामनाश्रम महास्वामी सभागृह" असे नाव देण्याबाबत कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-

2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानुसार भाईंदर (पुर्व) प्रभाग समिती क्र. 03 आ. क्र. 108 येथील भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदानावरील मार्केटच्या वरील महानगरपालिका सभागृहाला "वैश्यगुरु प. पुज्य. वामनाश्रम महास्वामी सभागृह" असे नाव देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरील निर्णयाची नियमानुसार संबंधित विभागाने अंमलबजावणी करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव सिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-1/22-23/SM/SG T- 13

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे, 401101
// माहिती व तंत्रज्ञान विभाग //

दि. 02/03/2023

(गोषवारा)

२८१

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका Development, Customisation, Upgradation and ATS for Online RTS Services (Design, Development, Customisation, Upgrade with latest Technology (language version, Database) and experienced manpower) कामी अवलोकन करणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका Development, Customisation, Upgradation and ATS for Online RTS Services (Design, Development, Customisation, Upgrade with latest Technology (language version, Database) and experienced manpower) कामी MBMC/PRO/371/2022-23 https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.16/11/2022 रोजी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदेचे टेंडर आयडी (2022_MBMC_852604_1) आहे. स्पर्धात्मक निविदा होण्यासाठी दि.०५/१२/२०२२ रोजी पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली. सदर निविदेस दि.१५/१२/२०२२ रोजी पर्यंत द्वितीय मुदतवाढ देण्यात आली. सदर कामी एक निविदा प्राप्त झाली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अधिसूचित केलेल्या सर्व सेवा दि.३१/१२/२०२ पर्यंत पूर्णत: ऑनलाईन करणेबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.आरटीएस-२०२२/प्र.क्र.१४२/लो.दि.क, दि.२८/११/२०२२ रोजी परिपत्रक पारित करण्यात आले आहे. सदर परिपत्रकानुसार प्राप्त निविदाधारकांचा तांत्रिक लिफाफा उघडणेस मा. आयुक्त सो. यांची दि.०५/०१/२०२३ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे. प्राप्त निविदाधारक M/s.DSS World Pvt.Ltd., यांनी निविदा अटीशर्तीनुसार कागदपत्र सादर केल्याने ते पात्र ठरले आहेत. सदरकामी पात्र निविदाधारक M/s.DSS World Pvt.Ltd., यांचा दराचा लिफाफा उघडणेस दि.१९/०१/२०२३ रोजी मा. निविदा निवड समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. पात्र निविदाधारक M/s.DSS World Pvt.Ltd., यांनी निविदेत सादर केलेले दर खालीलप्रमाणे

Sr.No.	Item-wise amounts	M/s.DSS World Pvt.Ltd., यांचे निविदेतील दर Total Amounts in Figure (Rs.)
1.	Online RTS Services for First Year - Design, Development Upgrade with latest Technology (language version, Database) and experienced manpower includes 1.Latest Version of PHP 2.Latest Version of MySQL 3.Development with Senior Developer 4. Expert DB admin support in development 5. Expert Designer Support in Development 6. Training and implementation 7. Reports	13,98,500/- INR
2.	Upgraded Cloud Service with (lastest configuration, Speed, RAM, bandwidth and Space) (for first year)	--
3.	Integration with Aaple Sarkar, Maitri Portal , MBMC application, mbmc portal and IGR portal	--
	Grand total in Words (T) (This figure shall be used for evaluation of financial proposals)	Rupees Thirteen Lakh Ninety Eight Thousand Thousand Five Hundred and Seventy Two only)

1. B change Request Manpower Cost

Sr.No.	Particulars	Man Month Rate (INR)
1.	Project Manager	95000.00 INR
2.	Business Analyst	45000.00 INR
3.	Sr. Software Developer	65000.00 INR
4.	Software Developer	25000.00 INR
5.	Tester	25000.00 INR

6	Any other resource (If Applicable)	15000.00 INR

वरीलपैकी पात्र निविदाधारक M/s.DSS World Pvt.Ltd., यांनी निविदेत सादर केलेल्या दरास मा. आयुक्त सो. यांची दि.17/02/2023 रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73(क) नुसार प्रशासकीय सभेत मिरा भाईंदर महानगरपालिका Development, Customisation, Upgradation and ATS for Online RTS Services (Design, Development, Customisation, Upgrade with latest Technology (language version, Database) and experienced manpower) कामी मा.प्रशासकीय सभेत अवलोकन करणेस शिफारस आहे.

(संजय शिंदे)
उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. २३/२/२०२३ सायं. ५.००
मा. प्रशासकीय सभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. २९६ वर्ष २०२२/२३

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

Z:\F drive\Computer 2020-21\164 महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश 2015 अंतर्गत नागरिकांना संगणकीय सेवा ऑनलाईनद्वारे\15. new गोषवारा मंजुरीसाठी.docx

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय सभा दि. ०२/०३/२०२३

प्रकरण क्र.२७ मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज **दि. ०२/०३/२०२३**

ठराव क्र.२८० मिरा भाईंदर महानगरपालिका Development, Customisation, Upgradation and ATS for Online RTS Services (Design, Development, Customisation, Upgrade with latest Technology (language version, Database) and experienced manpower) कामी अवलोकन करणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका Development, Customisation, Upgradation and ATS for Online RTS Services (Design, Development, Customisation, Upgrade with latest Technology (language version, Database) and experienced manpower) कामी MBMC/PRO/371/2022-23 https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.16/11/2022 रोजी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदेचे टेंडर आयडी (2022_MBMC_852604_1) आहे. स्पर्धात्मक निविदा होण्यासाठी दि.०५/१२/२०२२ रोजी पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली. सदर निविदेस दि.१५/१२/२०२२ रोजी पर्यंत द्वितीय मुदतवाढ देण्यात आली. सदर कामी एक निविदा प्राप्त झाली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अधिसूचित केलेल्या सर्व सेवा दि.३१/१२/२०२ पर्यंत पूर्णत: ऑनलाईन करणेबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.आरटीएस-२०२२/प्र.क्र.१४२/लो.दि.क, दि.२८/११/२०२२ रोजी परिपत्रक पारित करण्यात आले आहे. सदर परिपत्रकानुसार प्राप्त निविदाधारकांचा तांत्रिक लिफाफा उघडणेस मा. आयुक्त सो. यांची दि.०५/०१/२०२३ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे. प्राप्त निविदाधारक M/s.DSS World Pvt.Ltd., यांनी निविदा अटीशर्तीनुसार कागदपत्र सादर केल्याने ते पात्र ठरले आहेत. सदरकामी पात्र निविदाधारक M/s.DSS World Pvt.Ltd., यांचा दराचा लिफाफा उघडणेस दि.१९/०१/२०२३ रोजी मा. निविदा निवड समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. पात्र निविदाधारक M/s.DSS World Pvt.Ltd., यांनी निविदेत सादर केलेले दर खालीलप्रमाणे

Sr.No.	Item-wise amounts	M/s.DSS World Pvt.Ltd., यांचे निविदेतील दर Total Amounts in Figure (Rs.)
1.	Online RTS Services for First Year - Design, Development Upgrade with latest Technology (language version, Database) and experienced manpower includes 1.Latest Version of PHP 2.Latest Version of MySQL 3.Development with Senior Developer 4. Expert DB admin support in development 5. Expert Designer Support in Development 6. Training and implementation 7. Reports	13,98,500/- INR
2.	Upgraded Cloud Service with (lastest configuration, Speed, RAM, bandwidth and Space) (for first year)	--
3.	Integration with Aaple Sarkar, Maitri Portal , MBMC application, mbmc portal and IGR portal	--
	Grand total in Words (T) (This figure shall be used for evaluation of financial proposals)	Rupees Thirteen Lakh Ninety Eight Thousand Thousand Five Hundred and Seventy Two only)

1. B change Request Manpower Cost

Sr.No.	Particulars	Man Month Rate (INR)
1.	Project Manager	95000.00 INR
2.	Business Analyst	45000.00 INR
3.	Sr. Software Developer	65000.00 INR
4.	Software Developer	25000.00 INR
5.	Tester	25000.00 INR
6	Any other resource (If Applicable)	15000.00 INR

वरीलपैकी पात्र निविदाधारक M/s.DSS World Pvt.Ltd., यांनी निविदेत सादर केलेल्या दरास मा. आयुक्त सो. यांची दि.17/02/2023 रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73(क) नुसार प्रशासकीय सभेत मिरा भाईंदर महानगरपालिका Development, Customisation, Upgradation and ATS for Online RTS Services (Design, Development, Customisation, Upgrade with latest Technology (language version, Database) and experienced manpower) कामी मंजूरी देण्यात येत आहे. पारित ठरावानुसार संबंधित विभागाने पुढील योग्य कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरसाळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

// घनकचरा व्यवस्थापन //

// गोषवारा // दि. 02/03/2023

प्रकरण क्रमांक (२८२) :- १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाअंतर्गत Million Plus Cities गटासाठी "प्रभावी घनकचरा प्रकल्पाकरीता" प्राप्त अनुदानातुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्पा संबंधित करावयाच्या कामाबाबत आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्याबाबत...

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील Million Plus Cities गटासाठी प्रभावी घनकचरा व्सवस्थापन करणेकरीता खालीलप्रमाणे अनुदान प्राप्त झालेले आहे.

अ.क्र.		दिनांक	रक्कम
१.	१५th Finance Commission (SWM & WATER)	१०/११/२०२०	१०,४०,२४,१५९/-
		१६/०४/२०२१	१०,८१,३४,१५६/-
		०१/११/२०२२	२३,४१,३९,१७६/-
TOTAL			४४,६३,९७,५६१/-

१. SANITARY LANDFILL SITE तयार करणे.

सदर कामाकरीता उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी Sanitary Landfill site तयार करणे. सदर कामाचा DPR व Drawing यांना NEERI नागपुर यांनी तपासणी करुन Drawing Vetting करुन दिलेली आहे.

सदर कामाच्या रु.८,७३,१०,५४६/- अंदाजीत खर्चास ठराव क्र.२१ दि.२९/०९/२०२२ रोजी आर्थिक व प्रशासकिय ठरावांन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर कामाची निविदा दि.१७/११/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने दोन वेळा मुदतवाढ देण्यात आलेली आहे. विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांचा तांत्रिक लिफाफा दि.०५/०१/२०२३ रोजी उघडण्यात आला असुन सदर कामाची निविदा प्रक्रिया सुरु आहे. तसेच सदर कामाचा करारनामा करुन कार्यादेश देण्यात येणार आहे. सदर कामाकरीता लागणारी तरतुद अंदाजे रु.८,७३,१०,५४६/- १५ व्या वित्त आयोगाच्या खर्चातुन करणे आवश्यक आहे.

तरी घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी Sanitary Landfill site तयार करणे याकामी रु.८,७३,१०,५४६/- अंदाजे खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(रवि पवार)
उप-आयुक्त (घप्रवि)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

मिरा भाईंदर महानगरपालिका

// घनकचरा व्यवस्थापन //

प्रशासकिय ठराव दिनांक 02/03 /२०२३ रोजी दु. १२.०० वाजता

विषय क्रमांक - (२८२) मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज
१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाअंतर्गत Million Plus Cities गटासाठी "प्रभावी घनकचरा प्रकल्पाकरीता" प्राप्त अनुदानातुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्पा संबंधित करावयाच्या कामाबाबत आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत...

कार्यालयीन प्रस्तावना

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील Milion Plus Cities गटासाठी प्रभावी घनकचरा व्सवस्थापन करणेकरीता खालीलप्रमाणे अनुदान प्राप्त झालेले आहे.

अ.क्र.		दिनांक	रक्कम
१.	१५th Finance Commission (SWM & WATER)	१०/११/२०२०	१०,४०,२४,१५९/-
		१६/०४/२०२१	१०,८१,३४,१५६/-
		०१/११/२०२२	२३,४१,३९,१७६/-
TOTAL			**४४,६३,९७,५६१/-**

१. SANITARY LANDFILL SITE तयार करणे.

सदर कामाकरीता उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी Sanitary Landfill Site तयार करणे. सदर कामाचा DPR व Drawing यांना NEERI नागपुर यांनी तपासणी करुन Drawing Vetting करुन दिलेली आहे.

सदर कामाच्या रु.८,७३,१०,५४६/- अंदाजीत खर्चास ठराव क्र.२१ दि.२९/०९/२०२२ रोजी आर्थिक व प्रशासकिय ठरावांन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर कामाची निविदा दि.१७/११/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने दोन वेळा मुदतवाढ देण्यात आलेली आहे. विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांचा तांत्रिक लिफाफा दि.०५/०१/२०२३ रोजी उघडण्यात आला असुन सदर कामाची निविदा प्रक्रिया सुरु आहे. तसेच सदर कामाचा करारनामा करुन कार्यादेश देण्यात येणार आहे. सदर कामाकरीता लागणारी तरतुद अंदाजे रु.८,७३,१०,५४६/- १५ व्या वित्त आयोगाच्या खर्चातुन करणे आवश्यक आहे.

तरी घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी Sanitary Landfill site तयार करणे याकामी रु.८,७३,१०,५४६/- अंदाजे खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. २८१ दिनांक 02/03/2023

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाअंतर्गत Million Plus Cities गटासाठी "प्रभावी घनकचरा प्रकल्पाकरीता" प्राप्त अनुदानातुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्पा संबंधित करावयाच्या कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी वे विशेषत: कलम ४५२(अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाअंतर्गत Million Plus Cities गटासाठी "प्रभावी घनकचरा

प्रकल्पाकरीता" प्राप्त अनुदानातुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्पा संबंधित करावयाच्या कामांस एकुण रु.८,७३,१०,५४६/- अंदाजपत्रकिय खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवडकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत: घनकचरा प्रक्रिया प्रकल्प विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

मिरा भाईंदर महानगरपालिका

विभाग :- जाहिरात विभाग

(L)

दि. 02/03 /२०२३

(R)

// गोषवारा //

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि ड प्रकरण २ कलम १(र) नुसार फेरबदल करणे

प्रकरण क्र. 263 : जाहिरात फी बाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध व्यक्ती/संस्था/कंपनी यांना महानगरपालिकेच्या जागेवर ठेक्याद्वारे होर्डिंग्ज वर जाहिरात उभारण्याची परवानगी देण्यांत येत असते. तसेच काही व्यक्ती/संस्था/कंपनी यांना खाजगी जागेत मागणी नुसार महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ अन्वये सादर केलेली कागदपत्रे तपासुन जाहिरात उभारण्यास परवानगी देण्यांत येत असते. महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरानुसार जाहिरात फी आकारुन त्याची वसुली करण्यांत येते.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात शासनमार्फत प्राप्त मंजुरी नुसार सुधारीत जाहिरात दरपत्रकानुसार जाहिरात विभागाने अंमलबजावणी करुन जाहिरात फी वसुली करण्यात आली. महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ मधील कलम (२०) (क) मधील तरतुदीनुसार सदरचे परवाना शुल्क आकारामधील वाढ दर ३ वर्षांनंतर चलनवाढ दरानुसार निश्चित करावी असे नमुद आहे. सदर शासन अधिसुचनेनुसार सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात जाहिरात फी च्या शुल्कात वाढ करणे आवश्यक आहे. करीता लगतच्या भिवंडी निजामपूर महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, वसई- विरार शहर महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, बृहन्मुंबई महानगरपालिका या महानगरपालिकेंचे दरपत्रक मागवुन जाहिरातीचे दर ठरविण्यांत आलेले असुन मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दरवाढ करताना सन २०१४-१५ या वर्षातील दरावर प्रतिवर्षी १०% या प्रमाणे वाढ करुन त्यानुसार दि.२९/११/२०२२ रोजीच्या प्रशासकिय ठराव क्र. ११९ अन्वये ठराव पारीत करुन जाहिरात फीचे दरास मंजुरी प्राप्त झाली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका

विभाग :- जाहिरात विभाग

(L)

दि. / /२०२३

(R)

सदर ठरावान्वये जाहिरातदार यांना दि.२३/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सन २०२३-२४ पासुन दरवाढ लागु करणेबाबत कळविण्यांत आले आहे. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने मिरा-भाईंदर आऊटडोर मिडीया असोसीएशन व जाहिरातदार (मे. मौलिक एंटरप्रायजेस, मे. ऐंगेज आऊटडोर मिडीया, मे. ऐंगेज पब्लीसीटी प्रा.लि., मे. स्पार्क मिडीया, मे. आकाश इंटरप्रायजेस, मे. जेएसआरएम मिडीया, मे. जे.एम.डी ॲडव्हटायजर्स) यांनी पत्रान्वये जाहिरात विभागाने सादर केलेले दरपत्रकातील तुलनात्मक तक्ता पहाता इतर सर्व महानगरपालिकेपेक्षा विशेषत: मुंबई महानगरपालिकेपेक्षाही जास्त पटीने दर असल्याने मिरा-भाईंदर महानगरपालिकेनेमध्ये या पुढे व्यवसाय करण्यास शक्य होणार नाही. त्यामुळे आमचे व्यवसाय बंद होऊन महानगरपालिकेला महसुल प्राप्त होणार नाही. तरी सदर **प्रशासकिय ठरावाची अंमलबजावणी करण्याच्या अगोदर जर ठरावात दुरुस्ती करुन दरामध्ये कपात केली तर, भविष्यात आमचा व्यवसाय वाचु शकेल. व महानगरपालिकेला महसुल प्राप्त होईल असे कळविले आहे.**

याबाबत मा.आयुक्त यांनी दि.२१/०२/२०२३ रोजीच्या आदेशानुसार समिती गठित करुन जाहिरात विभागातील दराबाबत इतर महानगरपालिकेतील दरांशी तपासणी करुन वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणेबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार दि.२२/०२/२०२३ रोजी सर्व मिडीया असो. यांचे सदस्य (जाहिरातदार) यांची बैठक मा. अति.आयुक्त यांच्या समवेत घेऊन त्यांच्या जाहिरात दरावरील आक्षेपांबाबत चर्चा करुन त्यांचे प्रत्यक्ष म्हणणे ऐकुण घेतले त्यांनी बैठकीदरम्यान जाहिरात दर हे अवाजवी असुन आम्हाला व्यवसाय करणे शक्य होणार नाही. त्यामुळे आपण सन २०२३-२४ या वर्षात आकारण्यांत येणार असणारे दर कृपया कमी करावे. अशी विनंती केली.

त्यानुसार दि.२८/०२/२०२२ रोजीच्या शासन मान्यतेच्या पत्रानुसार सन २०१४-१५ या आर्थिक वर्षापासुन भुतपूर्वलक्षी प्रभावाने प्रती चौ. फुट रु.३०/- या दराने जाहिरात फी आकारणेबाबत मंजुरी मिळाली तसेच त्यामध्ये खाजगी जागेवरील उभारलेल्या होर्डिंगकरीता ३० % कमी दराने आकारणी करुन (सुट देऊन) जाहिरात फी ची वसुली केलेली आहे.

परंतु सदरचे दर हे सन २०१४-१५ पासुन असल्याने त्यामध्ये कोणतीही वाढ केलेली नव्हती महानगरपालिकेच्या जाहिरात विभागाने याबाबत इतर महानगरपालिकेच्या जाहिरात दरांशी तुलना करता प्रतिवर्षी १०% नैसर्गीक वाढ ग्राह्य धरुन सर्व दरांमध्ये वाढ करुन प्रशासकिय ठराव क्र.११९ नुसार आर्थिक व प्रशासकिय मान्यता घेऊन सन २०२३-२४

मिरा भाईंदर महानगरपालिका

विभाग :- जाहिरात विभाग

दि. / /२०२३

(L) (R)

पासुन वाढ केल्याचे दिसते. नैसर्गीक १०% वाढ करताना इतर लगतच्या महानगरपालिकांपेक्षा सर्वात जास्त दर तयार झाले आहेत. त्यामुळे दर वाढ करताना इतर महानगरपालिकेपेक्षा आपल्या महानगरपालिकेत दर निश्चित जास्त असल्याचे दिसते.

अ.क्र.	जाहिरातीचे प्रकार	भिवंडी निजामपूर मनपा	उल्हासनगर मनपा	कल्याण डोंबिवली मनपा	वसई -विरार मनपा	नवि मुंबई मनपा	ठाणे मनपा	बृहन्मुंबई महानगरपालिका	मिरा-भाईदर महानगरपालिका सद्यस्थितीतील दर प्रती चौ.फुट प्रती माह	मनपा प्रशासकीय ठराव क्र. ११९ दि. २१/११/२०२२ अन्वये मंजूर दर
		प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह		प्रती चौ.फुट प्रती माह
१	होर्डिंग (आकाशचिन्हे/ कमानी/ कॅन्टीलीवर पोल/									
	अ) मनपा जागेत निविदा प्रक्रियेद्वारे	९.५	१५	१५	२५	५	५८	४५८	३०	६१
	ब) खाजगी जागा/ इमारती इ. ठिकाणावरील	९.५	१५	१५	२०	५	३५	रु. १३८/- पहिल्या प्रति चौ.फुटाकरीता तद्नंतर वाढीव चौ.फुटाकरीता रु.९२/-	३०	५१
२	दिव्याच्या खांबावरील फलक (किऑक्स)	११४	-	-	४०	१५०	४४८	-	६०	१०६

मिरा भाईंदर महानगरपालिका

विभाग :- जाहिरात विभाग

(L)

दि. / /२०२३

(R)

अ.क्र.	जाहिरातीचे प्रकार	भिवंडी निजामपूर मनपा	उल्हासनगर मनपा	कल्याण डोंबिवली मनपा	वसई -विरार मनपा	नवि मुंबई मनपा	ठाणे मनपा	बृहन्मुंबई महानगरपालिका	मिरा-भाईदर महानगरपालिका सद्यस्थितीतील दर	मनपा प्रशासकीय ठराव क्र. ११९ दि. २१/११/२०२२ अन्वये मंजूर दर
		प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह
३	दुकानावरील जाहिरातीचे फलक	१४	१५	१५	२०	४५	२५७	रु. ९२/- पहिल्या प्रति चौ.फुटाकरीता तद्नंतर वाढीव चौ.फुटाकरीता रु.६०/-	१०	२०
४	अॅडपोल / युनिपोल	-	-	-	२०	-	-	-	-	१०६
५	चलत जाहिरात (एलईडी) Electronically running advertisement (Trivision) or electronic Scroller Advertisement	दुकानावरील जाहिरात फलकावरील जाहिरात फी रु.१४/- अधिक जाहिरात फी च्या ५% रक्कम	६१/-	-	-	-	-	रु. ५४९/- पहिल्या प्रति चौ.फुटाकरीता तद्नंतर वाढीव चौ.फुटाकरीता रु.३६६ /-	दुकानावरील जाहिरात फलकावरील जाहिरात फी रु.१०/- व जाहिरात फी च्या ३०% रक्कम	१५०
६	रोड शो									
	अ) रस्त्यावर १० ठिकाणा पर्यंत (प्रति दिन /प्रती नगास)	२,८५४	१,०००	-	१०००	१५००	३,३१३	-	२००० प्रतिदिन (प्रति नगास रु.२००/-)	३५००
	ब) आकाशातील प्रदर्शन (प्रति दिन /प्रती नगास)	२,८५४	-	-	१०००	१५०००	-	-	१०००	३५००

मिरा भाईंदर महानगरपालिका

विभाग :- जाहिरात विभाग

(L)

दि. / /२०२३

(R)

	क) एरियल बॅनर्स (प्रति दिन /प्रती नगास)	२८,५३२	-	-	-	१५०००	१९,४८७	-	१००००	१५०००
	ड) वाहनावरील जाहिरात (प्रति चौ.फुट प्रति माह)	२८.५	-	-	२०	१८०	१०१	२८८	-	१०१
	इ) सायकलवरील (तीन चाकी) जाहिरात (प्रति दिन /प्रती नगास)	-	-	-	-	-	-	-	-	५००

वरील तक्यात नमुद केलेले दर लगतच्या सर्व महानगरपालिकेपेक्षा जास्त असल्याचे दिसुन येते. त्यामुळे मिरा –भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरातदारांनी केलेल्या मागणीनुसार त्यांना हे दर वाजवीपेक्षा जास्त असल्याने त्यांना या क्षेत्रात व्यवसाय करणे शक्य होणार नाही. असे त्यांनी कळविले आहे. त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रातुन जाहिरात विभागास उत्पन्न वाढीच्या दृष्टीने सदरचे जाहिरातदार टिकुन राहणेही आवश्यक आहे. त्यामुळे यापूर्वीपासुन संबंधित खाजगी जाहिरातदार यांना सुट देऊन आकारणी करण्यांत येत असे. असे न करता वाजवी दर निश्चित करणे आवश्यक आहेत. जे दर संबंधित व्यवसायधारकांना परवडतील व शहरात त्यांच्या व्यवसाय वाढु शकेल व महानगरपालिकेस त्यामधुन उत्पन्न प्राप्त होऊ शकेल. जर जाहिरात फीचे दर इतर महानगरपालिकेतील जाहिरात फी दरापेक्षा जास्त असतील तर त्याचा परिणाम जाहिरात व्यवसायावर होऊन या महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरातदार आपले व्यवसाय करणे बंद करु शकतील. त्यामुळे ही समिती अशा निकषावर पोहचत आहे की, प्रशासकिय ठराव क्र.११९ दि.२९/११/२०२२ मधील मंजुर सर्व दरामध्ये फक्त बदल करुन त्यात नमुद केलेल्या सर्व दरांवर ३०% कपात करुन दरांमध्ये सुधारणा करुन सन २०२३-२४ या आर्थिक वर्षापासुन अंमलबजावणी करणे करीता केलेल्या ठरावात नव्याने बदल करून तसा ठराव करणे व त्यानंतर त्याची अंमलबजावणी करणेस ही समिती मान्यता देत आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे जाहिरात दरात कपात करुन दर आकारण्याची शिफारस करण्यांत आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका

विभाग :- जाहिरात विभाग

(L)

दि. / /२०२३

(R)

अ.क्र.	जाहिरातीचे प्रकार	भिवंडी निजामपूर मनपा	उल्हासनगर मनपा	कल्याण डोंबिवली मनपा	वसई -विरार मनपा	नवि मुंबई मनपा	ठाणे मनपा	बृहन्मुंबई महानगरपालिका	मनपा प्रशासकीय ठराव क्र. ११९ दि. २१/११/२०२२ अन्वये मंजूर दर	मनपा समितीने ३०% कपाती नुसार प्रस्तावित दर
		प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह
१	होर्डिंग (आकाशचिन्हे/ कमानी/ कॅन्टीलीवर पोल/									
	अ) मनपा जागेत निविदा प्रक्रियेद्वारे	९.५	१५	१५	२५	५	५८	४५८	६१	४३
	ब) खाजगी जागा/ इमारती इ. ठिकाणावरील	९.५	१५	१५	२०	५	३५	रु. १३८/- पहिल्या प्रति चौ.फुटाकरीता तद्नंतर वाढीव चौ.फुटाकरीता रु.९२/-	५१	३६
२	दिव्याच्या खांबावरील फलक (किऑक्स)	११४	-	-	४०	१५०	४४८	-	१०६	७५
३	दुकानावरील जाहिरातीचे फलक	१४	१५	१५	२०	४५	२५७	रु. ९२/- पहिल्या प्रति चौ.फुटाकरीता तद्नंतर वाढीव चौ.फुटाकरीता रु.६०/-	२०	१४
४	ॲडपोल / युनिपोल	-	-	-	२०	-	-	-	१०६	७५

मिरा भाईंदर महानगरपालिका

विभाग :- जाहिरात विभाग

दि. / /२०२३

(L) (R)

५	चलत जाहिरात (एलईडी) Electronically running advertisement (Trivision) or electronic Scroller Advertisement	दुकानावरील जाहिरात फलकावरील जाहिरात फी रु.१४/- अधिक जाहिरात फी च्या ५% रक्कम	६१/-	-	-	-	-	रु. ५४९/- पहिल्या प्रति चौ.फुटाकरीता तद्नंतर वाढीव चौ.फुटाकरीता रु.३६६ /-	१५०	१०५
६	रोड शो									
	अ) रस्त्यावर १० ठिकाणा पर्यंत (प्रति दिन /प्रती नगास)	२,८५४	१,०००	-	१०००	१५००	३,३१३	-	३५००	२४५०
	ब) आकाशातील प्रदर्शन (प्रति दिन /प्रती नगास)	२,८५४	-	-	१०००	१५०००	-	-	३५००	२१००
	क) एरियल बॅनर्स (प्रति दिन /प्रती नगास)	२८,५३२	-	-	-	१५०००	१९,४८७	-	१५०००	१०५००
	ड) वाहनावरील जाहिरात (प्रति चौ.फुट प्रति माह)	२८.५	-	-	२०	१८०	१०१	२८८	१०१	७१
	इ) सायकलवरील (तीन चाकी) जाहिरात (प्रति दिन /प्रती नगास)	-	-	-	-	-	-	-	५००	३५०

मिरा भाईंदर महानगरपालिका

विभाग :- जाहिरात विभाग
(L)

दि. / /२०२३
(R)

तरी वरील प्रमाणे समितीने घेतलेल्या निर्णयानुसार दराची निश्चिती करुन जाहिरात दरामध्ये प्रतीवर्षी ५% वाढ निश्चित करावी. व तसा ठरावात बदल करणे बाबत समितीने दिलेल्या अहवालानुसार दि. २९/११/२०२२ ठराव क्र. ११९ अन्वये पारीत झालेल्या ठरावात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि ड प्रकरण २ कलम १(र) नुसार समितीने शिफारस केलेल्या दरानुसार फेरबदलानुसार विचार विनिमय होवून निर्णय घेण्यास शिफारस आहे.

(मा. आयुक्त साो. यांचे मान्यतेने)

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (जाहिरात)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. 23/02/2023 वेळ सायं. ५.०० वा
मा. स्थायी समिती / प्रशासकीय गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र. २९७ वर्ष :- २०२२-२३

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

सर्वसाधारण सभा

प्रशासकीय ठराव दि.०२/०३/२०२३ रोजी ...१२.००..... वाजता

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि ड प्रकरण २ कलम १(र) नुसार फेरबदल करणे

प्रकरण क्र. :- २८३

विषय : जाहिरात फी बाबत.

कार्यालयीन प्रस्ताव

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध व्यक्ती/संस्था/कंपनी यांना महानगरपालिकेच्या जागेवर ठेक्याद्वारे होर्डिंग्ज वर जाहिरात उभारण्याची परवानगी देण्यांत येत असते. तसेच काही व्यक्ती/संस्था/कंपनी यांना खाजगी जागेत मागणी नुसार महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ अन्वये सादर केलेली कागदपत्रे तपासुन जाहिरात उभारण्यास परवानगी देण्यांत येत असते. महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरानुसार जाहिरात फी आकारुन त्याची वसुली करण्यांत येते.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात शासनमार्फत प्राप्त मंजुरी नुसार सुधारीत जाहिरात दरपत्रकानुसार जाहिरात विभागाने अंमलबजावणी करुन जाहिरात फी वसुली करण्यात आली. महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ मधील कलम (२०) (क) मधील तरतुदीनुसार सदरचे परवाना शुल्क आकारामधील वाढ दर ३ वर्षांनंतर चलनवाढ दरानुसार निश्चित करावी असे नमुद आहे. सदर शासन अधिसुचनेनुसार सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात जाहिरात फी च्या शुल्कात वाढ करणे आवश्यक आहे. करीता लगतच्या भिवंडी निजामपूर महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, वसई- विरार शहर महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, बृहन्मुंबई महानगरपालिका या महानगरपालिकेंचे दरपत्रक मागवुन जाहिरातीचे दर ठरविण्यांत आलेले असुन मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दरवाढ करताना सन २०१४-१५ या वर्षातील दरावर प्रतिवर्षी १०% या प्रमाणे वाढ करुन त्यानुसार दि.२९/११/२०२२ रोजीच्या प्रशासकिय ठराव क्र. ११९ अन्वये ठराव पारीत करुन जाहिरात फीचे दरास मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदर ठरावान्वये जाहिरातदार यांना दि.२३/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सन २०२३-२४ पासुन दरवाढ लागु करणेबाबत कळविण्यांत आले आहे. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने मिरा-भाईंदर आऊटडोर मिडीया असोसीएशन व जाहिरातदार (मे. मौलिक एंटरप्रायजेस, मे. ऐंगेज आऊटडोर मिडीया, मे. ऐंगेज पब्लीसीटी प्रा.लि., मे. स्पार्क मिडीया, मे. आकाश इंटरप्रायजेस, मे. जेएसआरएम मिडीया, मे. जे.एम.डी ॲडव्हटायजर्स) यांनी पत्रान्वये जाहिरात विभागाने सादर केलेले दरपत्रकातील तुलनात्मक तक्ता पहाता इतर सर्व महानगरपालिकेपेक्षा विशेषत: मुंबई महानगरपालिकेपेक्षाही जास्त पटीने दर असल्याने मिरा-भाईंदर महानगरपालिकेनेमध्ये या पुढे व्यवसाय करण्यास शक्य होणार नाही. त्यामुळे आमचे व्यवसाय बंद होऊन महानगरपालिकेला महसुल प्राप्त होणार नाही. तरी सदर प्रशासकिय ठरावाची अंमलबजावणी करण्याच्या अगोदर जर ठरावात दुरुस्ती करुन दरामध्ये कपात केली तर, भविष्यात आमचा व्यवसाय वाचु शकेल. व महानगरपालिकेला महसुल प्राप्त होईल असे कळविले आहे.

याबाबत मा.आयुक्त यांनी दि.२१/०२/२०२३ रोजीच्या आदेशानुसार समिती गठित करुन जाहिरात विभागातील दराबाबत इतर महानगरपालिकेतील दरांशी तपासणी करुन वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणेबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार दि.२२/०२/२०२३ रोजी सर्व मिडीया असो. यांचे सदस्य (जाहिरातदार) यांची बैठक मा. अति.आयुक्त यांच्या समवेत घेऊन त्यांच्या जाहिरात दरावरील आक्षेपांबाबत चर्चा करुन त्यांचे प्रत्यक्ष म्हणणे ऐकुण घेतले त्यांनी बैठकीदरम्यान जाहिरात दर हे अवाजवी असुन आम्हाला व्यवसाय करणे शक्य होणार नाही. त्यामुळे आपण सन २०२३-२४ या वर्षात आकारण्यांत येणार असणारे दर कृपया कमी करावे. अशी विनंती केली.

त्यानुसार दि.२८/०२/२०२२ रोजीच्या शासन मान्यतेच्या पत्रानुसार सन २०१४-१५ या आर्थिक वर्षापासुन भुतपूर्वलक्षी प्रभावाने प्रती चौ. फुट रु.३०/- या दराने जाहिरात फी आकारणेबाबत मंजुरी मिळाली तसेच त्यामध्ये खाजगी जागेवरील उभारलेल्या होर्डिंगकरीता ३० % कमी दराने आकारणी करुन (सुट देऊन) जाहिरात फी ची वसुली केलेली आहे.

परंतु सदरचे दर हे सन २०१४-१५ पासुन असल्याने त्यामध्ये कोणतीही वाढ केलेली नव्हती महानगरपालिकेच्या जाहिरात विभागाने याबाबत इतर महानगरपालिकेच्या जाहिरात दरांशी तुलना करता प्रतिवर्षी १०% नैसर्गीक वाढ ग्राह्य धरुन सर्व दरांमध्ये वाढ करुन प्रशासकिय ठराव क्र.११९ नुसार आर्थिक व प्रशासकिय मान्यता घेऊन सन २०२३-२४ पासुन वाढ केल्याचे दिसते. नैसर्गीक १०% वाढ करताना इतर लगतच्या महानगरपालिकांपेक्षा सर्वात जास्त दर तयार झाले आहेत. त्यामुळे दर वाढ करताना इतर महानगरपालिकेपेक्षा आपल्या महानगरपालिकेत दर निश्चित जास्त असल्याचे दिसते.

अ.क्र.	जाहिरातीचे प्रकार	भिवंडी निजामपूर मनपा	उल्हासनगर मनपा	कल्याण डोंबिवली मनपा	वसई -विरार मनपा	नवि मुंबई मनपा	ठाणे मनपा	बृहन्मुंबई महानगरपालिका	मिरा-भाईदर महानगरपालिका सद्यस्थितीतील दर प्रती चौ.फुट प्रती माह	मनपा प्रशासकीय ठराव क्र. ११९ दि. २१/११/२०२२ अन्वये मंजूर दर
		प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह		प्रती चौ.फुट प्रती माह
१	होर्डिंग (आकाशचिन्हे/ कमानी/ कॅन्टीलीवर पोल/									
	अ) मनपा जागेत निविदा प्रक्रियेद्वारे	९.५	१५	१५	२५	५	५८	४५८	३०	६१
	ब) खाजगी जागा/ इमारती इ. ठिकाणावरील	९.५	१५	१५	२०	५	३५	रु. १३८/- पहिल्या प्रति चौ.फुटाकरीता तद्नंतर वाढीव चौ.फुटाकरीता रु.९२/-	३०	५१
२	दिव्याच्या खांबावरील फलक (किऑक्स)	११४	-	-	४०	१५०	४४८	-	६०	१०६
३	दुकानावरील जाहिरातीचे फलक	१४	१५	१५	२०	४५	२५७	रु.९२/- पहिल्या प्रति चौ.फुटाकरीता तद्नंतर वाढीव चौ.फुटाकरीता रु.६०/-	१०	२०
४	ॲडपोल / युनिपोल	-	-	-	२०	-	-	-	-	१०६
५	चलत जाहिरात (एलईडी) Electronically running advertisement (Trivision) or electronic Scroller Advertisement	दुकानावरील जाहिरात फलकावरील जाहिरात फी रु.१४/- अधिक जाहिरात फी च्या ५% रक्कम	६१/-	-	-	-	-	रु. ५४९/- पहिल्या प्रति चौ.फुटाकरीता तद्नंतर वाढीव चौ.फुटाकरीता रु.३६६ /-	दुकानावरील जाहिरात फलकावरील जाहिरात फी रु.१०/- व जाहिरात फी च्या ३०% रक्कम	१५०

अ.क्र.	जाहिरातीचे प्रकार	भिवंडी निजामपूर मनपा	उल्हासनगर मनपा	कल्याण डोंबिवली मनपा	वसई -विरार मनपा	नवि मुंबई मनपा	ठाणे मनपा	बृहन्मुंबई महानगरपालिका	मिरा-भाईदर महानगरपालिका सद्यस्थितीतील दर प्रती चौ.फुट प्रती माह	मनपा प्रशासकीय ठराव क्र. ११९ दि. २१/११/२०२२ अन्वये मंजूर दर
		प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह		प्रती चौ.फुट प्रती माह
६	रोड शो									
	अ) रस्त्यावर १० ठिकाणा पर्यंत (प्रति दिन /प्रती नगास)	२,८५४	१,०००	-	१०००	१५००	३,३१३	-	२००० प्रतिदिन (प्रति नगास रु.२००/-)	३५००
	ब) आकाशातील प्रदर्शन (प्रति दिन /प्रती नगास)	२,८५४	-	-	१०००	१५०००	-	-	१०००	३५००
	क) एरियल बॅनर्स (प्रति दिन /प्रती नगास)	२८,५३२	-	-	-	१५०००	१९,४८७	-	१००००	१५०००
	ड) वाहनावरील जाहिरात (प्रति चौ.फुट प्रति माह)	२८.५	-	-	२०	१८०	१०१	२८८	-	१०१
	इ) सायकलवरील (तीन चाकी) जाहिरात (प्रति दिन /प्रती नगास)	-	-	-	-	-	-	-	-	५००

वरील तक्यात नमुद केलेले दर लगतच्या सर्व महानगरपालिकेपेक्षा जास्त असल्याचे दिसुन येते. त्यामुळे मिरा –भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरातदारांनी केलेल्या मागणीनुसार त्यांना हे दर वाजवीपेक्षा जास्त असल्याने त्यांना या क्षेत्रात व्यवसाय करणे शक्य होणार नाही. असे त्यांनी कळविले आहे. त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रातुन जाहिरात विभागास उत्पन्न वाढीच्या दृष्टीने सदरचे जाहिरातदार टिकुन राहणेही आवश्यक आहे. त्यामुळे यापूर्वीपासुन संबंधित खाजगी जाहिरातदार यांना सुट देऊन आकारणी करण्यांत येत असे. असे न करता वाजवी दर निश्चित करणे आवश्यक आहेत. जे दर संबंधित व्यवसायधारकांना परवडतील व शहरात त्यांच्या व्यवसाय वाढु शकेल व महानगरपालिकेस त्यामधुन उत्पन्न प्राप्त होऊ शकेल. जर जाहिरात फीचे दर इतर महानगरपालिकेतील जाहिरात फी दरापेक्षा जास्त असतील तर त्याचा परिणाम जाहिरात व्यवसायावर होऊन या महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरातदार आपले व्यवसाय करणे बंद करु शकतील. त्यामुळे ही

समिती अशा निकषावर पोहचत आहे की, प्रशासकिय ठराव क्र.११९ दि.२९/११/२०२२ मधील मंजुर सर्व दरामध्ये फक्त बदल करुन त्यात नमुद केलेल्या सर्व दरांवर ३०% कपात करुन दरांमध्ये सुधारणा करुन सन २०२३-२४ या आर्थिक वर्षापासुन अंमलबजावणी करणे करीता केलेल्या ठरावात नव्याने बदल करून तसा ठराव करणे व त्यानंतर त्याची अंमलबजावणी करणेस ही समिती मान्यता देत आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे जाहिरात दरात कपात करुन दर आकारण्याची शिफारस करण्यांत आलेली आहे.

अ.क्र.	जाहिरातीचे प्रकार	भिवंडी निजामपूर मनपा	उल्हासनगर मनपा	कल्याण डोंबिवली मनपा	वसई -विरार मनपा	नवि मुंबई मनपा	ठाणे मनपा	बृहन्मुंबई महानगरपालिका	मनपा प्रशासकीय ठराव क्र. ११९ दि. २१/११/ २०२२ अन्वये मंजूर दर	मनपा समितीने ३०% कपाती नुसार प्रस्तावित दर
		प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह
१	होर्डिंग (आकाशचिन्हे/ कमानी/ कॅन्टीलीवर पोल/									
	अ) मनपा जागेत निविदा प्रक्रियेद्वारे	९.५	१५	१५	२५	५	५८	४५८	६१	४३
	ब) खाजगी जागा/ इमारती इ. ठिकाणावरील	९.५	१५	१५	२०	५	३५	रु. १३८/- पहिल्या प्रति चौ.फुटाकरीता तद्नंतर वाढीव चौ.फुटाकरीता रु.९२/-	५१	३६
२	दिव्याच्या खांबावरील फलक (किऑक्स)	११४	-	-	४०	१५०	४४८	-	१०६	७५
३	दुकानावरील जाहिरातीचे फलक	१४	१५	१५	२०	४५	२५७	रु. ९२/- पहिल्या प्रति चौ.फुटाकरीता तद्नंतर वाढीव चौ.फुटाकरीता रु.६०/-	२०	१४
४	ॲडपोल / युनिपोल	-	-	-	२०	-	-	-	१०६	७५

अ.क्र.	जाहिरातीचे प्रकार	भिवंडी निजामपूर मनपा	उल्हासनगर मनपा	कल्याण डोंबिवली मनपा	वसई -विरार मनपा	नवि मुंबई मनपा	ठाणे मनपा	बृहन्मुंबई महानगरपालिका	मनपा प्रशासकीय ठराव क्र. ११९ दि. २१/११/२०२२ अन्वये मंजूर दर	मनपा समितीने ३०% कपाती नुसार प्रस्तावित दर
		प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह	प्रती चौ.फुट प्रती माह
५	चलत जाहिरात (एलईडी) Electronically running advertisement (Trivision) or electronic Scroller Advertisement	दुकानावरील जाहिरात फलकावरील जाहिरात फी रु.१४/- अधिक जाहिरात फी च्या ५% रक्कम	६१/-	-	-	-	-	रु. ५४९/- पहिल्या प्रति चौ.फुटाकरीता तद्नंतर वाढीव चौ.फुटाकरीता रु.३६६ /-	१५०	१०५
६	रोड शो									
	अ) रस्त्यावर १० ठिकाणा पर्यंत (प्रति दिन /प्रती नगास)	२,८५४	१,०००	-	१०००	१५००	३,३१३	-	३५००	२४५०
	ब) आकाशातील प्रदर्शन (प्रति दिन /प्रती नगास)	२,८५४	-	-	१०००	१५०००	-	-	३५००	२१००
	क) एरियल बॅनर्स (प्रति दिन /प्रती नगास)	२८,५३२	-	-	-	१५०००	१९,४८७	-	१५०००	१०५००
	ड) वाहनावरील जाहिरात (प्रति चौ.फुट प्रति माह)	२८.५	-	-	२०	१८०	१०१	२८८	१०१	७१
	इ) सायकलवरील (तीन चाकी) जाहिरात (प्रति दिन /प्रती नगास)	-	-	-	-	-	-	-	५००	३५०

- वरील जाहिरात फी दर हे फक्त अप्रकाशित जाहिरात फलकासाठी असून प्रकाशित जाहिरात फलकासाठी एकूण फी च्या २०% जादा फी आकारण्यात येईल.
- महानगरपालिका क्षेत्रातील दुकाने आस्थापनेवरील फक्त नावाच्या एका अप्रकाशित फलकावर संपूर्ण जाहिरात फी माफ करावी व प्रकाशित फलक व अन्य सर्व जाहिराती फलकावर जाहिरात फी आकारावी.
- दुकानांचे नावा व्यतीरीक्त दुकानाचे फलकावर उत्पादकाची जाहिरात केलेली असल्यास त्यास जाहिरात फी आकारण्याची कार्यवाही करण्यांत यावी. (उदा. मोबाईल कंपनी/बँका/हॉटेल व इतर उत्पादने व कंपन्यांचे फलक)
- वरील जाहिरात फी दरामध्ये प्रतीवर्षी ५% वाढ करणेत यावी.

तरी वरील प्रमाणे समितीने घेतलेल्या निर्णयानुसार दराची निश्चिती करुन जाहिरात दरामध्ये प्रतीवर्षी ५% वाढ निश्चित करावी व तसा ठरावात बदल करणे बाबत समितीने दिलेल्या अहवालानुसार दि. २९/११/२०२२ ठराव क्र. ११९ अन्वये पारीत झालेल्या ठरावात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि ड प्रकरण २ कलम १(र) नुसार समितीने शिफारस केलेल्या दरानुसार फेरबदलानुसार विचार विनिमय होवून निर्णय घेण्यास शिफारस आहे.

सर्वसाधारण सभा प्रशासकीय ठराव क्र. २८२ **दिनांक** ०२/०३/२०२३

मिरा-भाईंदर महानगरपालिका जाहिरात विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ मधील कलम (२०) (क) मधील तरतुदीनुसार सदरचे परवाना शुल्क आकारामधील वाढ दर ३ वर्षांनंतर चलनवाढ दरानुसार निश्चित करावी असे नमुद आहे. सदर शासन अधिसुचनेनुसार सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात जाहिरात फी च्या शुल्कात वाढ करणे आवश्यक आहे. करीता लगतच्या भिवंडी निजामपूर महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, वसई- विरार शहर महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, बृहन्मुंबई महानगरपालिका या महानगरपालिकेंचे दरपत्रक मागवुन जाहिरातीचे दर ठरविण्यांत आलेले असुन मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दरवाढ करताना सन २०१४-१५ या वर्षातील दरावर प्रतिवर्षी १०% या प्रमाणे वाढ करुन त्यानुसार दि.२९/११/२०२२ रोजीच्या प्रशासकिय ठराव क्र. ११९ अन्वये ठराव पारीत करुन जाहिरात फीचे दरास मंजुरी प्राप्त झाली आहे.

परंतु सदर प्रशासकिय ठराव क्र.११९ अन्वये पारीत केलेले जाहिरात फी दर जास्त असलेबाबत संबंधित जाहिरातदार यांनी पत्रान्वये कळविण्यांत आले आहे. सदरचे दराबाबत प्रशासकिय ठराव क्र. ११९ दि.२९/११/२०२२ अन्वये मंजुर केलेल्या दराची पडताळणी करणेकामी समिती गठीत करण्यांत आली. सदर समितीच्या दिलेल्या अहवालानुसार, प्रशासकिय ठराव क्र.११९ दि.२९/११/२०२२ मधील मंजुर सर्व दरामध्ये फक्त बदल करुन त्यात नमुद केलेल्या सर्व दरांवर ३०% कपात करुन दरांमध्ये सुधारणा करुन सन २०२३-२४ या आर्थिक वर्षापासुन अंमलबजावणी करणे करीता केलेल्या ठरावात नव्याने बदल करून तसा ठराव करणेस समितीने दिलेल्या मान्यतेनुसार जाहिरात दरामध्ये ३०% कपात करुन दर आकारण्याची शिफारस करण्यांत आलेली आहे. त्यानुसार सदर प्रस्तावाचे अवलोकन करण्यांत आले आहे.

जाहिरात विभागाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि ड प्रकरण २ कलम १(र) नुसार समितीने शिफारस केलेल्या दरानुसार फेरबदलानुसार जाहिरात फी चे दर निश्चित केले आहेत. सदर दरानुसार जाहिरात फी ची सन २०२३-२४ या आर्थिक वर्षापासुन आकारणी करणेस आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देण्यांत येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रत :- जाहिरात विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीकरीता सादर.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. प्रशासकिय सभा दि. ०२/०३ /२०२३

गोषवारा

प्रकरण क्र.२८४ :- औद्योगिक क्षेत्रातील पोटमाळयांना केलेल्या कर आकारणी बाबत धोरण निश्चित करणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांचे जीआयएस सर्व्हेक्षण करणेकरीता मे. कोलब्रो ग्रुप यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांनी दि. ०२/०३/१९ पासून सर्व्हेक्षणाच्या कामास सुरवात केली.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विशेषत: प्रभाग क्र. ३, ४ व ६ मध्ये औद्योगिक कारखाने कार्यरत आहेत. जीआयएस सर्व्हेक्षण अंतर्गत अनेक औद्योगिक संकुलनात पोटमाळे असल्याचे व त्यांना कर आकारणी झालेली नसल्याचे आढळून आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १५०(अ) नुसार जास्तीत जास्त ६ वर्षे मागे जाऊन कर आकारणी करण्याची तरतुद असल्याने मे. कोलब्रो ग्रुप मार्फत त्याचे मोजमाप घेऊन पोटमाळयांचे वाढीव क्षेत्रास ६ वर्षे मागे जाऊन तत्कालीन प्रचलित दराने कराची आकारणी केलेली आहे.

या झालेल्या सुनावणी दरम्यान इंडस्ट्रीयल इस्टेट मधील गाळे धारक / मालमत्ता धारक यांनी प्रस्तावित केलेल्या कर आकारणी करीता प्रामुख्याने गाळ्यामध्ये तयार करण्यात आलेल्या पोटमाळ्यास आकारणेत आलेल्या कर व अनधिकृत बांधाकामास खालीलप्रमाणे हरकत घेतलेली आहे.

१. कर आकारणी ही चालु वर्षापासून करावी.

२. पोटमाळ्याची शास्ती रद्द करावी.

३. पोटमाळ्यास कर आकारणी ही करयोग्यमुल्याच्या ५० टक्के दराने करावी.

या बाबत कर आकारणी करीता विभागाकडुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

१. मा. महासभा ठराव क्रं. ६० दि. २०/०२/२०१८ अन्वये निश्चित केलेल्या दरानुसार कर आकारणीची कार्यवाही करण्यात येत आहे.

२. या पुर्वी कर आकारणी न झालेल्या मालमत्तेस मनपा अधिनियम चे कलम १५०(अ) अन्वये जास्तीत जास्त ६ वर्षे मागे जाऊन कर आकरणी करण्याची तरतुद आहे. त्यानुसार आकारणीची कार्यवाही करणेत आलेली आहे.

३. ज्या मालमत्तेस बांधकाम परवानगी प्राप्त नसेल अश्या मालमत्तेस मनपा अधिनियम चे कलम २६७(अ) नुसार शास्ती सह कर आकरणी करण्याची तरतुद आहे. त्यानुसार पोटमाळयास शास्तीची आकारणी झालेली आहे.

त्यानुसार मागणी नोटीस देणेत आलेली आहे. तथापि, सदर कर भरणा करणेस कारखानदार तयार नाहीत. त्यामुळे याबाबत निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे.

सबब, प्राप्त हरकती व अधिनिमातील तरतूद यांचा विचार करता, खालील प्रमाणे मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे.

१. मा. महासभा ठराव क्रं. ४२ दि. ०३/०८/२०२२ अशासकीय ठराव.

२. मनपा अधिनियम चे कलम ९९ व अधिनियमातील कराधान नियम चे कलम ८(७) अन्वये कर आकारणीचे दर निश्चित करण्याकरीता कार्यपध्दत नमुद आहे.

वरील मुद्दा क्रं. ०१ बाबत मा. महासभेने केलेला अशासकीय ठराव हा महापलिकेच्या आर्थिक हिताविरुध्द असल्यामुळे प्रशासनामार्फत या ठरावाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. मुद्दा क्रं. ०२

बाबत मनपा अधिनियमात कर आकारणी करीता निश्चित करावयाचे दर हे इमारती करीता दर्शविण्यात आलेले आहेत. तथापी पोटमाळ्यास कर आकारणी करीता दर नमुद नाहीत.

तसेच मिरा भाईंदर मनपा हद्दीतील औद्योगीक क्षेत्रातील मालमत्तांचे सर्व्हेक्षण २०२०-२१ मध्ये झाले असुन, सदर वाढीव बांधकाम / पोटमाळे यांना जुन २०२१ मध्ये पासुन कर आकारणीच्या नोटीस देण्यात आलेल्या होत्या. या सर्व बाबींचा विचार करता नव्याने आढळून आलेले वाढीव बांधकाम / पोटमाळे यांना कर आकारणी ही दि. ०१/०४/२०२० पासुन (कर आकारणी वर्ष २०२०-२१) प्रचलीत मंजुर कर दर व वार्षिक भाडेमुल्यानुसार मा. महासभा ठराव क्रं. ६० दि. २०/०२/२०१८ करणेंच्या प्रस्तावास मा. आयुक्त तथा प्रशासक यांची मान्यता असावी.

(संजय शिंदे)
उप-आयुक्त (कर)
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. २४/०२/२०२३ वेळ ४.२३
मा. स्थ[illegible] प्रशासकीय गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. २९९ वर्ष :- २०२२-२३

सिटीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासकिय ठराव दि. ०२/०३/२०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता

प्रकरण क्र.२८४ :- औद्योगिक क्षेत्रातील पोटमाळयांना केलेल्या कर आकारणी बाबत धोरण निश्चित करणे बाबत.

कार्यालयीन प्रस्ताव

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांचे जीआयएस सर्व्हेक्षण करणेकरीता मे. कोलब्रो ग्रुप यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांनी दि. ०२/०३/१९ पासून सर्व्हेक्षणाच्या कामास सुरवात केली.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विशेषतः प्रभाग क्र. ३, ४ व ६ मध्ये औद्योगिक कारखाने कार्यरत आहेत. जीआयएस सर्व्हेक्षण अंतर्गत अनेक औद्योगिक संकुलनात पोटमाळे असल्याचे व त्यांना कर आकारणी झालेली नसल्याचे आढळून आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १५०(अ) नुसार जास्तीत जास्त ६ वर्षे मागे जाऊन कर आकारणी करण्याची तरतुद असल्याने मे. कोलब्रो ग्रुप मार्फत त्याचे मोजमाप घेऊन पोटमाळयांचे वाढीव क्षेत्रास ६ वर्षे मागे जाऊन तत्कालीन प्रचलित दराने कराची आकारणी केलेली आहे.

या झालेल्या सुनावणी दरम्यान इंडस्ट्रीयल इस्टेट मधील गाळे धारक / मालमत्ता धारक यांनी प्रस्तावित केलेल्या कर आकारणी करीता प्रामुख्याने गाळ्यामध्ये तयार करण्यात आलेल्या पोटमाळ्यास आकारणेत आलेल्या कर व अनधिकृत बांधाकामास खालीलप्रमाणे हरकत घेतलेली आहे.

४. कर आकारणी ही चालु वर्षापासून करावी.

५. पोटमाळ्याची शास्ती रद्द करावी.

६. पोटमाळ्यास कर आकारणी ही करयोग्यमुल्याच्या ५० टक्के दराने करावी.

या बाबत कर आकारणी करीता विभागाकडुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

४. मा. महासभा ठराव क्रं. ६० दि. २०/०२/२०१८ अन्वये निश्चित केलेल्या दरानुसार कर आकारणीची कार्यवाही करण्यात येत आहे.

५. या पुर्वी कर आकारणी न झालेल्या मालमत्तेस मनपा अधिनियम चे कलम १५०(अ) अन्वये जास्तीत जास्त ६ वर्षे मागे जाऊन कर आकरणी करण्याची तरतुद आहे. त्यानुसार आकारणीची कार्यवाही करणेत आलेली आहे.

६. ज्या मालमत्तेस बांधकाम परवानगी प्राप्त नसेल अश्या मालमत्तेस मनपा अधिनियम चे कलम २६७(अ) नुसार शास्ती सह कर आकरणी करण्याची तरतुद आहे. त्यानुसार पोटमाळयास शास्तीची आकारणी झालेली आहे.

त्यानुसार मागणी नोटीस देणेत आलेली आहे. तथापि, सदर कर भरणा करणेस कारखानदार तयार नाहीत. त्यामुळे याबाबत निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे.

सबब, प्राप्त हरकती व अधिनिमातील तरतूद यांचा विचार करता, खालील प्रमाणे मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे.

३. मा. महासभा ठराव क्रं. ४२ दि. ०३/०८/२०२२ अशासकीय ठराव.

४. मनपा अधिनियम चे कलम ९९ व अधिनियमातील कराधान नियम चे कलम ८(७) अन्वये कर आकारणीचे दर निश्चित करण्याकरीता कार्यपध्दत नमुद आहे.

वरील मुद्दा क्रं. ०१ बाबत मा. महासभेने केलेला अशासकीय ठराव हा महापलिकेच्या आर्थिक हिताविरुध्द असल्यामुळे प्रशासनामार्फत या ठरावाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. मुद्दा क्रं. ०२

बाबत मनपा अधिनियमात कर आकारणी करीता निश्चित करावयाचे दर हे इमारती करीता दर्शविण्यात आलेले आहेत. तथापी पोटमाळ्यास कर आकारणी करीता दर नमुद नाहीत.

तसेच मिरा भाईंदर मनपा हद्दीतील औद्योगीक क्षेत्रातील मालमत्तांचे सर्व्हेक्षण २०२०-२१ मध्ये झाले असुन, सदर वाढीव बांधकाम / पोटमाळे यांना जुन २०२१ मध्ये पासुन कर आकारणीच्या नोटीस देण्यात आलेल्या होत्या. या सर्व बाबींचा विचार करता नव्याने आढळून आलेले वाढीव बांधकाम / पोटमाळे यांना कर आकारणी ही दि. ०१/०४/२०२० पासुन (कर आकारणी वर्ष २०२०-२१) प्रचलीत मंजुर कर दर व वार्षिक भाडेमुल्यानुसार मा. महासभा ठराव क्रं. ६० दि. २०/०२/२०१८ करणेंच्या प्रस्तावास मा. आयुक्त तथा प्रशासक यांची मान्यता असावी.

प्रशासकिय ठराव क्र. २८३ दिनांक ०२/०३/२०२३

प्रशासनाने सादर केलेला गोषवारा विचारात घेवून मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील औद्योगिक क्षेत्रांच्या पोटमाळयांना यापूर्वी केलेली कर आकारणी रद्द करुन दि. ०१/०४/२०२० पासून मा. महासभा ठराव क्र. ६० दि. २०/०२/२०१८ अन्वये निश्चित केलेल्या दरा नुसार करावी. तसेच याबाबत संबधित मालमत्ता धारक यांना सुधारीत कर आकारणी तक्ता व मिळकत कर आकारणी नोटीस पारीत करण्यात यावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगररचना विभाग

// गोषवारा //

दि. 02/03/2023

प्रकरण क्र. (२८५) :- भूसंपादन - मिरा- भाईंदर महानगरपालिका,

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीमधील मौजे-चेणे, येथील सर्व्हे क्रमांक-102पै., चे 7/12 उताऱ्यानुसारचे क्षेत्र 80,430 चौ.मी पैकी 7472.00 चौ.मी. क्षेत्र हे खालील सार्वजनिक बाबींकरीता भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क़ अधिनियम, 2013 (नवीन भूसंपादन अधिनियम-2013) च्या तरतूदीनुसार खालील सार्वजनिक प्रयोजनाकरीता **"विकास योजना बाह्य"** पद्धतीने संपादन करणेकामी ठराव मंजुरी बाबत.

अ) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रस्तावीत चेना नदीवरील पाणी पुरवठा योजना,

ब) मिरा भाईंदर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन

क) महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ (MSEDCL) या प्रयोजनाकरीता

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे चेणे येथील सर्व्हे क्रमांक 102पै., या जागेचे क्षेत्र **अ) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रस्तावीत चेना नदीवरील पाणी पुरवठा योजना, ब) घनकचरा व्यवस्थापन आणि क) महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ (MSEDCL)** या सार्वजनिक प्रयोजनाकरीता विकास योजना बाह्य पद्धतीने जमिनीचे संपादन करणेकामी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचेकडील पत्र क्र. मनपा/पापु/899/2020-21 दि.26/10/2020 यांचे पत्र प्राप्त झाले आहे. सदर पत्रान्वये कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या चेणा येथील चेने नदीवर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडून कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधण्याचे प्रस्तावीत आहे. सदर बंधाऱ्यामुळे अडविल्या जाणाऱ्या पाण्याच्या स्त्रोतावर आधारीत चेना गावासाठी पाणी पुरवठा योजनेची संकल्पना पाणी पुरवठा विभागामार्फत तयार करण्यात आलेली आहे. सदर योजनेअंतर्गत प्रस्तावीत अप्रोच ब्रिज, जलशुद्धीकरण केंद्र व शुद्ध पाण्याच्या टाकीच्या बांधकामासाठी अंदाजे 2000 चौ.मी. जागेची आवश्यकता असून सदरची बांधकामे ही चेना नदीला लागून बांधावयाची असल्याने त्याकामी 2000 चौ.मी. क्षेत्र उपलब्ध करुन देणेबाबत विनंती करण्यात आली आहे.

तसेच अधीक्षक अभियंता, ठाणे अर्बन सर्कल, ठाणे, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसीटी डिस्ट्रीब्युशन कंपनी लिमिटेड, ठाणे अर्बन सर्कल यांनी दि.14/12/2022 रोजीच्या पत्रान्वये मेट्रो लाईन-4 च्या अनुषंगाने सब-स्टेशन करणेकरीता जागेची मागणी केली आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी घनकचरा व्यवस्थापन करणेसाठी जागेची आवश्यकता आहे.

विषयांकित जमिनीमधील काही क्षेत्राची आवश्यकता आहे. वरील 03 सार्वजनिक प्रयोजनासाठी मंजूर विकास योजनेत कोणत्याही प्रकारचे आरक्षण प्रस्तावीत नसल्याने विषयांकित अ ते क या सार्वजनिक प्रयोजनासाठी भूमिचे संपादन हे विकास योजना बाह्य पद्धतीने करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने मा. आयुक्त सो., यांना पूर्व मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला असता त्यास दि.13/02/2023 रोजीच्या टिप्पणी अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

विषयांकित जागेचे मंजूर विकास योजनेतील तपशील पुढील प्रमाणे आहे.

"मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर विकास योजनेमध्ये मौजे-चेणे, येथील स.क्र.102पै., ही जागा **नाविकास विभागात** अंतर्भूत होत असून सदर जागेचे भागश: क्षेत्र 18.00 मी. रुंद प्रस्तावीत विकास योजना रस्ता तसेच 18.00 मी. रुंद विकास योजना बाह्य रस्ता ज्यास मा. आयुक्त सो., यांनी मंजुरी दिलेली असून सदर प्रस्तावाने बाधीत होत आहे. सदर जागेच्या दक्षिणेस मौजे-चेणे पाडा आहे. तसेच सदर जागेच्या उत्तरेस चेना नदी आहे. आणि सदर जागेच्या पूर्वेस अस्तित्वातील रस्ता व चेना नदी आहे.या जागेच्या पश्चिमेस 18.00 मी. रुंद अस्तित्वातील रस्ता आहे. सदर जागेचे क्षेत्र मंजूर विकास योजनेत यापूर्वी आ.क्र.375 अन्वये 'बगीचा' साठी आरक्षित होते. तथापि, विकास योजना मंजूरीच्या वेळी सदरचे क्षेत्र बगीचा या आरक्षणातून वगळून ना-विकास विभागात अंतर्भूत केलेले आहे."

मंजूर विकास योजनेतील 18.00 मी. रुंद रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्र हे स्वतंत्र विकास योजना बाह्य प्रस्तावाद्वारे संपादित करणेकामी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांना भूसंपादन प्रस्ताव मिरा भाईंदर महानगरपालिकेचे पत्र क्र.मिभा/मनपा/नर/4105/2022-23 दि.18/01/2023 अन्वये सादर करण्यात आलेला आहे. सबब सदर 18.00 मी. रुंद रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्र विद्यमान प्रस्तावात समाविष्ट केलेले नाही. उर्वरित विषयांकित **अ,ब आणि क** मध्ये नमुद प्रयोजनासाठी सद्यस्थितीत भू-संपादन करणे आवश्यक असून त्यासाठी लागणारे क्षेत्र सोबतच्या श्री. राणे, खाजगी सर्व्हेअर यांनी तयार केलेल्या नकाशात रेखांकित करुन दर्शविण्यात आलेले आहे. त्यानुसार संपादन करावयाच्या अंदाजित क्षेत्राचा तपशील खालील प्रमाणे आहे. या मधील (क) मधील प्रस्तावामधील संपादक मंडळ अधीक्षक अभियंता, ठाणे अर्बन सर्कल, ठाणे, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसीटी डिस्ट्रीब्युशन कंपनी लिमिटेड, ठाणे अर्बन सर्कल यांनी मेट्रो लाईन-4 असणार असून त्यांच्याकडून संपादन पोटी होणारा व त्या अनुषंगीक खर्च (न्यायालयीन खर्च, आस्थापना खर्च व इतर खर्च उद्भवल्यास) करणार आहे. त्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका कोणत्याही स्वरुपाचा खर्च करणार नाही. तसेच या संदर्भात त्यांच्याकडून आर्थिक तरतूदींबाबत करारनामा निष्पादित करणे आवश्यक आहे. असा करारनामा निष्पादित झाल्यानंतरच भूमि संपादन कामीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी सो., ठाणे यांना सादर करणे उचित होईल.

अ.क्र.	संपादनाचे प्रयोजन	गावाचे नाव	सर्व्हे क्रमांक	संपादनासाठी आवश्यक क्षेत्र (चौ.मी.)	7/12 उताऱ्यावरील क्षेत्र (चौ.मी.)
1	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रस्तावीत चेना नदीवरील पाणी पुरवठा योजना,	चेणे	102पै.,	3736.00	80430
	मिरा भाईंदर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन			1868.00	
	महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ (MSEDCL)			1868.00	
			एकूण :-	**7472.00**	**80430**

तरी उपरोक्त 03 संदर्भित पत्रानुसारची मागणी विचारात घेता विषयांकित सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक क्षेत्र भूमि संपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013 (नवीन भूसंपादन अधिनियम-2013) च्या खालील तरतूदीनुसार संपादित करुन जागा ताब्यात घेणे योग्य होईल.

याप्रकरणी मंजूर विकास योजना व प्रारुप सुधारीत विकास योजना 2017-2037 नुसारचे विकास योजना तपशील खालील प्रमाणे आहेत.

1) मंजूर विकास योजनेनुसार विकास योजना नुसारचा तपशील -

मंजूर विकास योजनेमध्ये मौजे-चेणे येथील सर्व्हे क्रमांक 102 चे क्षेत्र 18.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत असून उर्वरित जागा **भागश: ना-विकास विभागात** अंतर्भूत होत आहे.

2) प्रारुप सुधारीत विकास योजनेनुसार विकास योजना 2017-2037 नुसारचा तपशील -

मौजे-चेणे येथील सर्व्हे क्रमांक 102 चे क्षेत्र भागश: ना-विकास विभाग (नॅशनल पार्क) विभागात अंतर्भूत होत असून 12.00 मी. व 18.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याने तसेच आ.क्र.298 (क्रीमीअेशन ग्राऊंड) अन्वये बाधीत होत आहे.

मौजे-चेणे येथील सर्व्हे क्रमांक 102पै., चे क्षेत्र विकास योजना व विकास योजना बाह्य 18.00 मी. रुंद रस्त्याने बाधीत होत आहे. सदर बाधीत क्षेत्राच्या जमिनीची मालकी खालील प्रमाणे असल्याचे आढळून येते.

अ.क्र	सर्व्हे क्रमांक	भोगवटादाराचे नाव	7/12 उताऱ्यावरील क्षेत्र (चौ.मी.)	शेरा
1	102	श्रीम. वरुणा तांबे	80,430	दि.18/04/2022 रोजीच्या 7/12 उताऱ्या नुसार मालकी हक्क आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 344 मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्थावर मालमत्ता संपादन करणेबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर जमिनींचे भूमि संपादन करणे शक्य आहे. याप्रकरणी विकास योजना बाह्य 18.00 मी. रुंद रस्त्याचे 6991.00 चौ.मी. इतके क्षेत्र महानगरपालिकेस ताब्यात घ्यावयाचे आहे.त्यासाठीचा स्वतंत्र प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांना सादर केलेला आहे.

आजमितीस मौजे-चेणे, येथील सर्व्हे क्रमांक 102पै., चे बाजारमुल्य दर तक्ता सन 2022-23 मधील विभाग क्रमांक 10/38 नुसार खुल्या जमिनीचा दर अनुक्रमे रु.6450/- प्रति चौ.मी. असा आहे. त्यानुसार सदर जमिनींचे बाजार मुल्य दर तक्त्यानुसार खुल्या जमिनीचे मुल्यांकन खालील प्रमाणे हिशोबीत होईल.

अ.क्र.	स.क्र./हि. क्र.	संपादन करावयाचे क्षेत्र (चौ.मी.)	खुल्या जमिनीचा दर रुपये / प्रति चौ.मी.	खुल्या जमिनीचे मुल्य (रु.)	दिलासा रक्कम (Amount of solatium) (रु.)	12% अतिरिक्त घटकांची रक्कम (रु.) (1 वर्षा करीता)	झाडे बांधकाम इत्यादी शासीची रक्कम (रु.)	एकूण रक्कम (रु.)
1	102पै.,	3736.00	6450	24097200	24097200	2891664	प्रत्यक्षात मुल्यांकना नुसार	51086064
2		1868.00	6450	12048600	12048600	1445832		25543032
3		1868.00	6450	12048600	12048600	1445832		25543032
एकूण		7472.00		48,194,400/-	4,81,94,400/-	57,83,328/-		10,21,72,128/-
(एकूण अक्षरी रु.- दहा कोटी एकवीस लाख, बहात्तर हजार, एकशे अठ्ठावीस मात्र)								

वरील प्रमाणे भूमि संपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क़ अधिनियम,2013(नवीन भूसंपादन अधिनियम-2013) खालील तरतूदीनुसार विषयांकित जमिनीचे संपादन करावयाचे झाल्यास संपादनापोटी अंदाजित खर्च रक्कम रु.10,21,72,128/- इतकी हिशोबित होईल. त्याचप्रमाणे सदर रक्कमेवर संपादन करावयासाठी आस्थापना खर्च व इतर न्यायालयीन खर्चाची रक्कम अतिरिक्त राहील. सबब सदर भूसंपादन कार्यवाही करणेसाठी व त्यासाठीची अंदाजपत्रकिय रक्कम रु.10,21,72,128/- (एकूण अक्षरी रु. दहा कोटी एकवीस लाख, बहात्तर हजार, एकशे अठ्ठावीस मात्र) इतक्या खर्चाच्या रक्कमेस मा. आयुक्त तथा प्रशासक यांची प्रशासकीय मंजुरी मिळणे आवश्यक

आहे. तथापि, रु.2,55,43,032/- इतकी रक्कम महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसीटी डिस्ट्रीब्युशन कंपनी लिमिटेड, (MSEB) कडुन भरणे आवश्यक आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रारूप सुधारीत विकास 2017-2037 नुसार **अ) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रस्तावीत चेना नदीवरील पाणी पुरवठा योजना, ब) घनकचरा व्यवस्थापन आणि क) महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ (MSEDCL)** या सार्वजनिक प्रयोजनाने मौजे-चेणे येथील सर्व्हे क्रमांक 102 या जमिनींचे एकूण एकत्रीत क्षेत्र 7472.00 चौ.मी., संपादन करणे साठी भूमि संपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क़ अधिनियम,2013(नवीन भूसंपादन अधिनियम-2013)खालील तरतूदीनुसार संपादन करणेकामी येणाऱ्या खर्चाची रक्कम रु.10,21,72,128/- (एकूण अक्षरी रु. **दहा कोटी एकवीस लाख, बहात्तर हजार, एकशे अठ्ठावीस मात्र**) इतक्या खर्चास महाराष्ट्र महानगर अधिनियमाच्या कलम 73(क) अन्वये मा. प्रशासक यांची वित्तीय मंजुरी मिळण्यास विनंती आहे.

भूमि संपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क़ अधिनियम,2013(नवीन भूसंपादन अधिनियम-2013) या अधिनियमानुसार संपादन करणेसाठी जिल्हाधिकारी ठाणे यांना विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी ठाणे यांना भूमि संपादन करण्यासाठी महानगरपालिकेने सादर करावयाच्या प्रस्तावामध्ये भूमि संपादन करणेसाठी ठराव पारीत करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने सदर प्रकरणी भूमि संपादन करणेसाठी मा. आयुक्त तथा प्रशासक सो., यांचेकडे प्रकरण सादर करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने **अ) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रस्तावीत चेना नदीवरील पाणी पुरवठा योजना, ब) मिरा भाईंदर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन आणि क) महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ (MSEDCL)** या सार्वजनिक प्रयोजनाकरीता जागा संपादन करणेस मान्यता मिळणेसाठीच्या ठरावास मा.आयुक्त तथा प्रशासक यांची मंजुरी मिळणेस विनंती आहे असा प्रस्ताव सादर केला आहे.

(मा. आयुक्त तथा प्रशासक सो., यांचे मान्यतेने.)

(के. ज. शिंदे)
प्र. सहायक संचालक, नगररचना
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. २७/२/२०२३ वेळ - ४.४०
प्रशासकीय विभाग गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. 300 वर्ष :- २०२२/२३

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. २८४ दि. ०२/०३ /2023

प्रकरण क्र. २८५ :- भूसंपादन - मिरा- भाईंदर महानगरपालिका,

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीमधील मौजे-चेणे, येथील सर्व्हे क्रमांक-102पै., चे 7/12 उताऱ्यानुसारचे क्षेत्र 80,430 चौ.मी पैकी 7472.00 चौ.मी. क्षेत्र हे खालील सार्वजनिक बाबींकरीता भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 (नवीन भूसंपादन अधिनियम-2013) च्या तरतूदीनुसार खालील सार्वजनिक प्रयोजनाकरीता **"विकास योजना बाह्य"** पद्धतीने संपादन करणेकामी प्रशासकीय मंजुरी बाबत.

अ) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रस्तावीत चेना नदीवरील पाणी पुरवठा योजना,

ब) मिरा भाईंदर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन

क) महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ (MSEDCL) या प्रयोजनाकरीता

// कार्यालयीन प्रस्तावना //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे चेणे येथील सर्व्हे क्रमांक 102पै., या जागेचे क्षेत्र **अ) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रस्तावीत चेना नदीवरील पाणी पुरवठा योजना, ब) घनकचरा व्यवस्थापन आणि क) महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ (MSEDCL)** या सार्वजनिक प्रयोजनाकरीता विकास योजना बाह्य पद्धतीने जमिनीचे संपादन करणेकामी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचेकडील पत्र क्र. मनपा/पापु/ 899/2020-21 दि.26/10/2020 यांचे पत्र प्राप्त झाले आहे. सदर पत्रान्वये कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या चेणा येथील चेने नदीवर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडून कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधण्याचे प्रस्तावीत आहे. सदर बंधाऱ्यामुळे अडविल्या जाणाऱ्या पाण्याच्या स्त्रोतावर आधारीत चेना गावासाठी पाणी पुरवठा योजनेची संकल्पना पाणी पुरवठा विभागामार्फत तयार करण्यात आलेली आहे. सदर योजनेअंतर्गत प्रस्तावीत अप्रोच ब्रिज, जलशुद्धीकरण केंद्र व शुद्ध पाण्याच्या टाकीच्या बांधकामासाठी अंदाजे 2000 चौ.मी. जागेची आवश्यकता असून सदरची बांधकामे ही चेना नदीला लागून बांधावयाची असल्याने त्याकामी 2000 चौ.मी. क्षेत्र उपलब्ध करुन देणेबाबत विनंती करण्यात आली आहे.

तसेच अधीक्षक अभियंता, ठाणे अर्बन सर्कल, ठाणे, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसीटी डिस्ट्रीब्युशन कंपनी लिमिटेड, ठाणे अर्बन सर्कल यांनी दि.14/12/2022 रोजीच्या पत्रान्वये मेट्रो लाईन-4 च्या अनुषंगाने सब-स्टेशन करणेकरीता जागेची मागणी केली आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी घनकचरा व्यवस्थापन करणेसाठी जागेची आवश्यकता आहे.

विषयांकित जमिनीमधील काही क्षेत्राची आवश्यकता आहे. वरील 03 सार्वजनिक प्रयोजनासाठी मंजूर विकास योजनेत कोणत्याही प्रकारचे आरक्षण प्रस्तावीत नसल्याने विषयांकित अ ते क

या सार्वजनिक प्रयोजनासाठी भूमिचे संपादन हे विकास योजना बाह्य पद्धतीने करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने मा. आयुक्त सो., यांना पूर्व मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला असता त्यास दि.13/02/2023 रोजीच्या टिप्पणी अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

विषयांकित जागेचे मंजूर विकास योजनेतील तपशील पुढील प्रमाणे आहे.

"मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर विकास योजनेमध्ये मौजे-चेणे, येथील स.क्र.102पै., ही जागा **नाविकास विभागात** अंतर्भूत होत असून सदर जागेचे भागश: क्षेत्र 18.00 मी. रुंद प्रस्तावीत विकास योजना रस्ता तसेच 18.00 मी. रुंद विकास योजना बाह्य रस्ता ज्यास मा. आयुक्त सो., यांनी मंजुरी दिलेली असून सदर प्रस्तावाने बाधीत होत आहे. सदर जागेच्या दक्षिणेस मौजे-चेणे पाडा आहे. तसेच सदर जागेच्या उत्तरेस चेना नदी आहे. आणि सदर जागेच्या पूर्वेस अस्तित्वातील रस्ता व चेना नदी आहे.या जागेच्या पश्चिमेस 18.00 मी. रुंद अस्तित्वातील रस्ता आहे. सदर जागेचे क्षेत्र मंजूर विकास योजनेत यापूर्वी आ.क्र.375 अन्वये 'बगीचा' साठी आरक्षित होते. तथापि, विकास योजना मंजूरीच्या वेळी सदरचे क्षेत्र बगीचा या आरक्षणातून वगळून ना-विकास विभागात अंतर्भूत केलेले आहे."

मंजूर विकास योजनेतील 18.00 मी. रुंद रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्र हे स्वतंत्र विकास योजना बाह्य प्रस्तावाद्वारे संपादित करणेकामी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांना भूसंपादन प्रस्ताव मिरा भाईंदर महानगरपालिकेचे पत्र क्र.मिभा/मनपा/नर/4105/2022-23 दि.18/01/2023 अन्वये सादर करण्यात आलेला आहे. सबब सदर 18.00 मी. रुंद रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्र विद्यमान प्रस्तावात समाविष्ट केलेले नाही. उर्वरित विषयांकित **अ,ब आणि क** मध्ये नमुद प्रयोजनासाठी सद्यस्थितीत भू-संपादन करणे आवश्यक असून त्यासाठी लागणारे क्षेत्र सोबतच्या श्री. राणे, खाजगी सर्व्हेअर यांनी तयार केलेल्या नकाशात रेखांकित करुन दर्शविण्यात आलेले आहे. त्यानुसार संपादन करावयाच्या अंदाजित क्षेत्राचा तपशील खालील प्रमाणे आहे. या मधील (क) मधील प्रस्तावामधील संपादक मंडळ अधीक्षक अभियंता, ठाणे अर्बन सर्कल, ठाणे, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसीटी डिस्ट्रीब्युशन कंपनी लिमिटेड, ठाणे अर्बन सर्कल यांनी मेट्रो लाईन-4 असणार असून त्यांच्याकडून संपादन पोटी होणारा व त्या अनुषंगीक खर्च (न्यायालयीन खर्च, आस्थापना खर्च व इतर खर्च उद्भवल्यास) करणार आहे. त्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका कोणत्याही स्वरुपाचा खर्च करणार नाही. तसेच या संदर्भात त्यांच्याकडून आर्थिक तरतूदींबाबत करारनामा निष्पादित करणे आवश्यक आहे. असा करारनामा निष्पादित झाल्यानंतरच भूमि संपादन कामीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी सो., ठाणे यांना सादर करणे उचित होईल.

अ.क्र.	संपादनाचे प्रयोजन	गावाचे नाव	सर्व्हे क्रमांक	संपादनासाठी आवश्यक क्षेत्र (चौ.मी.)	7/12 उताऱ्यावरील क्षेत्र (चौ.मी.)
